सोनेतारण कर्ज
१० ग्रॅमसाठी १२%
फक्त १० मिनिटात रु. ७०,०००/-
मुदतठेव १३ महिने १०% | वाहन कर्ज योजना १५% | दामदुप्पट ठेव योजना ९० महिने
कैलास नागरी सहकारी पतसंस्था मर्या.
मुख्य कार्यालय : श्रीरंग अपार्टमेंट, शनि मंदिरासमोर, गुजरगल्ली, स्वामी विवेकानंद चौक, अ.नगर. फोन : २३४५९८३.

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १५.१०.२०२५ | अंक नं. १६५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

खास दिवाळी साठी ऑफर
SACHI Fashion
लहान मुलांच्या वस्त्रांची स्वप्न नगरी
२ ड्रेस खरेदी करा १ मोफत मिळवा
२०९३ नालबंद खुंट, कापडबाजार रोड, अहिल्यानगर ०२४१ २३४४६४९

दिवाळीचं सेलिब्रेशन
मनसोक्त खरेदीचं परफेक्ट डेस्टीनेशन
₹1000/- च्या पुढील खरेदीवर मिळवा आकर्षक हमखास गिफ्ट
₹2000/- च्या पुढील खरेदीवर मिळवा
₹1000/- किंमतीचे रेमंड कंपनीचे आकर्षक बेडशीट अगदी फ्री
• ब्रॅन्डेड सारीज • डिझाईनर सारीज • टॉप्स • कुर्तीज • ड्रेस मटेरियल
रंगीबेरंगी वस्त्राचं अवघं विश्व..
@ आशिर्वाद
- लक्ष्मीपती डिझाईनर साडी स्टुडिओ -
गुरू गणेश कॉम्प्लेक्स, माळीवाडा, अहिल्यानगर
फोन : 0241-2425111 / 9260278511
Conditions Apply

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा
दिवाळी निमित्त खास ऑफर
खरेदी करा फ्लॅटच्या किंमतीमध्ये लक्झरियस रो-बंगलो प्राईम लोकेशनमध्ये
रेडी पझेशन | 3 BHK
Get Ready To Celebrate Lifestyle ! सुखी जीवनाची सुरुवात...
SHRI BALAJI CONSTRUCTION
LUXURIOUS TWIN-BUNGLOWS
All Perfect Amenities, with Corporation Completion Certificate
Prop. - T.R. MANGALARAM (M. 9225326809, 9822216809)
ROHAN T MANGALARAM B.E. Civil Engineer (M. 8806553888)

Plot No. 92, Shivnagar, Juna Pimpalgaon Malvi Rd., Near Hotal Rajnandini, A.Nagar
तुमचा ट्विन बंगलो सणासुदिच्या मुहूर्तावर आजच बुक करा!
Credits - Engineer & Developer Ajay Gurud (M. 9822287111) | Legal Advisor Shirish Gatne | Structural Designer Deepak Mutha
Off - 21, Satbhai Mala, Near Bagroja Hudco, Ahmednagar
संपर्क- तुळशिदास मंगलाराम- 9822216809

# मंत्रालयामधून कामे मिळवून देण्याच्या आमिषाने ठेकेदारांची लाखोंची फसवणूक

## अहिल्यानगरमध्ये अनेकांसोबत घडला प्रकार; मंत्र्याच्या तथाकथित भाच्याविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – आपण मंत्र्याचे भाचे आहोत, तुम्हाला थेट मंत्रालयातून कामे मंजूर करून देतो, असे आमिष दाखवत एकाने नगरमधील अनेक शासकीय ठेकेदारांकडून लाखो रुपये घेत त्यांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. दोन ठेकेदारांनी याप्रकरणी पोलिस ठाण्यात धाव घेत फिर्याद दिली आहे. या दोघांची ९ लाख ४० हजारांची फसवणूक झाली आहे.

याबाबत सचिन गोरख रासकर (वय २८, रा. हंगा, ता. पारनेर) यांनी १४ ऑक्टोबर रोजी दुपारी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे शासकीय विद्युत व स्थापत्य ठेकेदार आहेत. त्यांच्यासमवेत गणेश महादेव काळे (रा. एकनाथनगर, केडगाव) हे ही शासकीय ठेकेदार असून त्यांच्या ओळखीचे आहेत. मे २०२४ मध्ये फिर्यादी हे मुंबईत मंत्रालयात गेलेले असताना त्यांची असिफ अत्तार खान (रा. कोंढवा, पुणे) या व्यक्तीशी भेट झाली. त्याने आपण अल्पसंख्यांक विभागाचे मंत्री अब्दुल सत्तार यांचे भाचे आहोत, असे सांगत त्यांच्यासोबतचे फोटो दाखविले. त्यानंतर तुम्हाला अल्पसंख्यांक विभागातील हायमास्ट विद्युत दिव्यांचे काम मिळवून देतो. मी अनेक ठेकेदारांना कामे मिळवून दिली आहे. तेव्हा फिर्यादी यांनीही त्याला आम्हाला कामे मिळवून द्या असे सांगितले.

त्यावेळी त्याने त्यासाठी पैसे द्यावे लागतील असे सांगितले असता फिर्यादी यांनी पैसे देण्याची तयारी दर्शविली. त्यावेळी असिफ खान याने तुमच्यासोबत इतर ठेकेदारांना गोळा करून सर्वांना एकाच वेळी कामे मंजूर करून देतो, असे सांगितल्यावर फिर्यादीने त्यांच्या ओळखीचे गणेश काळे यांना याबाबत सांगितले. काळे यांनी आपण असिफ खान यास समक्ष मंत्रालयात भेटू, असे सांगितल्यावर दोघे मे २०२४ मध्ये मंत्रालयाच्या बाहेर असिफ खान यास भेटले. तेथे त्यांच्यात पुन्हा कामे आणि पैसे याबाबत चर्चा झाली. जुलै २०२४ मध्ये असिफ खान याने फिर्यादी यांना फोन करून कामांसाठी ९ लाख रुपये लागतील, ते फोन पे वर पाठवा, असे सांगितले.

मात्र फिर्यादी यांनी फोन पे वर एवढे पैसे जात नाहीत, असे सांगितल्यावर असिफ खान याने मी उद्या नगरला येत आहे. पैसे तयार ठेवा, असे सांगितले. दुसऱ्या दिवशी गणेश काळे यांच्या मार्केट यार्ड येथील ऑफिसमध्ये काळे यांनी फिर्यादी समक्ष असिफ खान यास ८ लाख रुपये दिले. २८ जुलै रोजी असिफ खान याने फिर्यादीला पुन्हा फोन करून उर्वरित १ लाख रुपये पाठविण्यास सांगितले. त्यावेळी त्यांनी ५० हजार रुपये फोन पे वर पाठविले. त्यानंतर १ ऑक्टोबर रोजी असिफ खान याने फिर्यादीला फोन करून पुन्हा १ लाख रुपये मागितले. तेव्हा त्यांनी ५० हजार आणि ४० हजार असे ९० हजार रुपये पाठविले.

त्यानंतर फिर्यादी यांनी कामासाठी अनेकदा असिफ खान याच्याशी संपर्क साधला मात्र त्याने उडवाउडवीची उत्तरे देत टाळाटाळ केली. त्यानंतर फिर्यादी यांनी माहिती घेतली असता असिफ खान याने नगर शहरातील व जिल्ह्यातील अनेक शासकीय ठेकेदारांकडून काम मिळवून देण्याच्या आमिषाने लाखो रुपये घेवून त्यांची फसवणूक केलेली आहे. ही माहिती मिळाल्यावर फिर्यादी रासकर व त्यांचे सहकारी गणेश काळे यांनी पोलिस ठाण्यात फिर्याद देण्याचा निर्णय घेतला आणि १४ ऑक्टोबर रोजी फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी तत्कालीन मंत्री अब्दुल सत्तार यांचा तथाकथित भाचा असिफ खान याच्याविरुद्ध भा.दं. वि.कलम ४०६, ४२० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# स्वस्तात प्लॉट देण्याच्या आमिषाने १५ लाख रुपयांची फसवणूक; बांधकाम व्यावसायिकाविरुद्ध गुन्हा दाखल


नगर – कमी किंमतीत प्लॉट व जमीन घेवून देण्याच्या आमिषाने नगरमधील औषध विक्रेत्याची १५ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी नगरच्या कोतवाली पोलिस ठाण्यात कल्याण येथील बांधकाम व्यावसायिकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत संदीप दत्तात्रय खरपुडे (रा. गोंधळे गल्ली, माळीवाडा, हल्ली रा. एकदंत कॉलनी, औसरकर मळा, सारसनगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे मेडिकल दुकान आहे. त्यांचे मित्र स्वप्निल लाहोर यांच्यामार्फत त्यांची कल्याण येथील बांधकाम व्यावसायिक आशिष उमाशंकर पांडे याच्याशी ओळख झाली होती. सन २०२१ मध्ये स्वप्निल लाहोर याने फिर्यादीला सांगितले की, आशिष पांडे हा कमी किंमतीत प्लॉट व जमीन घेवून देतो. त्यामुळे फिर्यादीने त्याच्याशी संपर्क साधला. त्यावेळी त्याने वेगवेगळ्या जमिनी दाखवून फिर्यादीचा विश्वास संपादन केला.

त्यावेळी आशिष पांडे याने जमीन खरेदी करून देण्यासाठी १५ लाख रुपये मागितले. त्याच्यावर विश्वास ठेवून फिर्यादी यांनी त्यास २१ जानेवारी २०२१ रोजी त्याच्या बँक खात्यावर ५ लाख व त्याचे वडील उमाशंकर पांडे यांच्या बँक खात्यावर ५ लाख तसेच २२ जानेवारी रोजी पुन्हा ५ लाख असे १५ लाख रुपये आरटीजीएसद्वारे पाठविले. त्यावेळी त्याने १५ दिवसांत तुम्हाला प्लॉट व जमिनीची खरेदी देतो, असे सांगितले. १५ दिवसांनी फिर्यादीने त्याच्याशी संपर्क साधल्यावर त्याने आणखी ५ लाख रुपयांची मागणी केली. त्यावेळी फिर्यादीकडे पैसे नसल्याने त्याने नकार दिला. त्यामुळे आशिष पांडे म्हणाला की, माझ्याकडून तुमचे काम होणार नाही, मी तुमचे १५ लाख परत देतो.

त्यानंतर काही दिवसांनी फिर्यादीने आशिष पांडे यास पैशांची मागणी केल्यावर तो आज देतो उद्या देतो असे सांगून टाळाटाळ करू लागला. गेल्या ४ वर्षात फिर्यादीने आशिष पांडे कडे अनेकदा पैशांची मागणी केली. मात्र त्याने पैसे दिले नाही आणि प्लॉट किंवा जमीनही खरेदी करून दिली नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे निदर्शनास आल्यावर खरपुडे यांनी १४ ऑक्टोबर रोजी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी आशिष पांडे व त्याचे वडील उमाशंकर पांडे या दोघांच्याविरोधात भा.दं. वि.कलम ४०६, ४२० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.


आपल्या विचाराने, कार्याने, कर्तृत्वाने आर्थिक क्षेत्रात भरीव योगदान देणारे
आदर्श व्यक्तिमत्व...
सहकारमहर्षी, समाजभुषण
स्व. सुवालालजी गुंदेचा
स्वर्गवास दि. १६-१०-२०१८
आदरणीय भाऊ
आपल्या ७ व्या पुण्यस्मरण दिनी
भावपूर्ण श्रध्दांजली !
प्रशांत भंडारी सरव्यवस्थापक | अभय पितळे व्हा. चेअरमन | समीर बोरा चेअरमन
संचालक – संतोष गांधी । मनोज गुंदेचा । शैलेश गांधी । चेतन भंडारी
विनित बोरा । ॲड. आनंद फिरोदिया । सौ. सुवर्णा डागा । सौ. प्रिती बोगावत ।
शरद गोयल । विनय भांड ।
तज्ञ संचालक – शांतीलाल गगळे । सीए डॉ. परेश बोरा
व सर्व कर्मचारी वृंद
SSGJOP
सहकारमहर्षी श्री सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सह. पतसंस्था मर्या., अहमदनगर.
सिटी सर्व्हे नं. ३६२३, बँक रोड, अहिल्यानगर. फोन : ०२४१ – २३५४२९५, २३२३३०५,
शाखा – मार्केट यार्ड, अहिल्यानगर. फोन : ०२४१–२४५११९५, मो. ८८०९८८०९२५
E-mail : jainoswalpatsanstha@gmail.com

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar.
Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999

दिनांक : 09 ऑक्टोबर 2025 ते 16 ऑक्टोबर 2025
टिप : मुव्ही–शो च्या वेळा बदलु शकतात
Sakaal Tar Hou Dya 05:15 PM
Tron: Ares 02:15 PM I 07:45 PM
Jolly LLB 3 02:20 PM
Mana Che Shlok 05:15 PM
Sunny Sanskari Ki Tulsi Kumari 09:30 AM I 07:25 PM I 10:00 PM
Kantara : A Legen 08:00 AM I 09:00 AM 11:05 AM I 12:05 PM 03:15 PM I 04:30 PM 06:20 PM I 09:30 PM 10:00 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mob. 6353564618 / 7790094001

या दिवाळीत करा तुमच्या चित्रपट अनुभवाला आणखी खास!
CineLife MINIPLEX
CineLife दिवाळी ऑफर!
Box Office वरून तिकीट बुक करा आणि मिळवा FREE FOOD COUPON!*
T&C Apply
Show Timings साठी QR कोड स्कॅन करा
बुकिंगसाठी संपर्क करा :
9881300400, 0241-2346000
नगर कॉलेज जवळ, झुडीओच्या वरती, अ.नगर

FOR - B.COM, M.COM, BBA, BBCA, MBA STUDENT
CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
100% JOB ASSISTANCE
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION | TAXATION, BANKING
ADVANCE ACCOUNTING | AUDITING
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
IN JUST 17900/-
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001 9371051769
Old ST stand Branch: Office No.140, 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, Ahmednagar-414001 9371151769
Pipeline Branch: Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003 7447761769
An ISO 9001:2015 Certified DISHA COMPUTER INSTITUTE

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# महापालिकेची प्रारुप मतदारयादी ६ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार

नगर - महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रारुप मतदारयादी ६ नोव्हेंबरला प्रसिद्ध करण्यात येणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदारयादी कार्यक्रम जाहीर केला आहे.

त्यानुसार महापालिका प्रशासनाने १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार याद्या राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवरुन १४ ऑक्टोबर रोजी डाऊनलोड करणे बंधनकारक आहे.

या मतदारयादीवरुन महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारुप मतदाार यादी तयार करुन ती हरकती व सूचना मागविण्याकरीता ६ नोव्हेंबर ला प्रसिद्ध करणे, १४ नोव्हेंबर पर्यंत हरकती व सूचना मागविणे, त्यानंतर आलेल्या हरकती व सूचनांवर निर्णय घेऊन प्रभाग निहाय अंतीम मतदार यादी २८ नोव्हेंबरला प्रसिद्ध करणे, मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी ४ डिसेंबर रोजी प्रसिद्ध करणे तसेच मतदान केंद्र निहाय मतदार यादी १० डिसेंबर रोजी प्रसिद्ध करणे असा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

# अहिल्यानगर मनपाची प्रभाग रचना, आरक्षण जाहीर करण्यास विलंब का?

**मन मानेल पद्धतीने प्रभागांची तोडफोड करू देणार नाही : शिवसेना उबाठा गटाचे उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव यांचा न्यायालयात जाण्याचा इशारा**

नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व महानगरपालिकांची प्रभाग रचना व आरक्षण रचना जाहीर करण्यात आली असताना, अहिल्यानगर महानगरपालिकेने मात्र मुदत संपूनही प्रभाग रचना जाहीर न केल्याने वाद निर्माण झाला आहे. या संपूर्ण प्रकरणामागे राजकीय हस्तक्षेप असल्याचा आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने केला आहे.

शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव यांनी सांगितले की, महानगरपालिकेतील सत्ताधाऱ्यांनी आपल्या उमेदवारांना सोयीस्कर ठरतील अशा पद्धतीने प्रभागांचे फेरबदल करण्याचे काम केले आहे. निवडणूक आयोगाने ठरविलेल्या मुदतीनंतरही मनपात रचना बदलण्याचे प्रकार सुरू आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अजित पवार हे आपापल्या पक्षांचे विविध जिल्ह्यात दौरे करत आहेत त्यात ते उघडपणे जनता आमच्या पाठीशी आहे त्यामुळे आम्हाला सत्ता १००% मिळेल असा दावा करत आहेत. प्रत्यक्षात आपल्या सोयीने प्रभाग रचना करून मतांचे ध्रुवीकरण करण्याचा हा घाट घातलेला आहे. जर तुमच्याकडे बहुमत आहे असे तुम्ही ठामपणे सांगत असाल तर आहे ती प्रभाग रचना तशीच राहू द्या, त्यात फेरबदल करू नका अशी मागणी त्यांनी केली आहे.

वॉर्डरचना आणि आरक्षण जाहीर करताना रस्ते, लोक वस्ती, दलित वस्ती, अपार्टमेंट कॉलनी, नदीकाठचा परिसर, यामध्ये विभागणी करू नये असे असताना आपल्या सोयीच्या मतदारांना एका वार्डात घेण्यासाठी उभ्या पद्धतीने वॉर्ड ची रचना करण्यात आली मागील निवडणुकीत जी आडवी आणि आयताकृती होती पण थेट झेंडीगेट पासून नालेगाव पर्यंत एकच वॉर्ड, ज्या रहिवाशांचा कधीही एकमेकांशी संबंध आला नाही अशा प्रकारच्या करण्यात आली असून, दलित वस्तीची तोडफोड करून वेगळ्याच प्रभागांना हा भाग जोडण्यात आला आहे. यामध्ये महामार्ग, उड्डाणपूल, नदीकाठ याची देखील दोन भागात विभागणी झालेली आहे. विद्यमान विरोधी पक्षाच्या उमेदवारांना गैरसोयीचे होईल अशा प्रकारे भाग करण्यात आले.

स्थानिक लोकप्रतिनिधी, माजी खासदारांकडे आणि पालकमंत्र्यांकडे याबाबत दाद मागा असे तक्रार करणे सांगतात. प्रत्यक्षात भाजपा राष्ट्रवादी आणि शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या परस्पर सल्ल्यानुसार अशी रचना करण्यात आली आहे. हा विद्यमान व माजी नगरसेवक आणि दलित समाजावर अन्याय आहे. हे पूर्णपणे बेकायदेशीर असून, अधिकाराचा सर्रास गैरवापर आहे.

जाधव यांनी या संदर्भात मनपा आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना निषेधपत्र देण्याची घोषणा केली आहे. तसेच निवडणूक आयोग आणि न्यायालयात याविरोधात दाद मागण्याचा इशारा दिला आहे. त्यांनी प्रसिद्ध केलेल्या निषेध पत्रकात नमूद करण्यात आले आहे की, प्रभाग रचना ही सर्व पक्षांसाठी समान न्यायाच्या तत्वावर केली गेली पाहिजे. पण सध्याची मनमानी रचना लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांवर घाला घालणारी आहे. आम्ही हे कोणत्याही परिस्थितीत होऊ देणार नाही.

# नागरदेवळे गट व गणातील मतदार यादीबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**हजारो नावे दुबार, काही चुकीची व मयत व्यक्तींचीही नावे कायम असल्याचा आरोप**

नगर - नगर तालुक्यातील नागरदेवळे जिल्हा परिषद गट आणि गणामध्ये मतदार यादीतील गंभीर त्रुटींमुळे लोकशाही प्रक्रियेवर प्रश्नवचिन्ह उपस्थित करुन निखील शेलार, मुकेश झोडगे, सागर खरपुडे, राहुल शिंदे, महेश बोरुडे, आणि किरण शेलार यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन लेखी तक्रार दाखल केली. नागरदेवळे, वडारवाडी, बुऱ्हाणनगर आणि परिसरातील अनेक गावांमध्ये हजारो मतदारांची नावे चुकीची, दुबार आणि मयत व्यक्तींची कायम असल्याचे पुराव्यासह स्पष्टीकरण देऊन त्यांनी हरकती नोंदविल्या आहेत.

नागरदेवळे जिल्हा परिषद गट क्र. ४८, पंचायत समिती गण क्र. ९५ आणि केकती गण क्र. ९६ च्या प्रारूप मतदार यादीत मोठ्या प्रमाणात गोंधळ असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनेक मतदारांच्या घर क्रमांकांच्या ठिकाणी ओ, एनए, पीएमटी अशा चुकीच्या नोंदी दिसून येत आहेत. तहसील कार्यालयात निवडणूक अधिकारी तथा नायब तहसीलदार अभिजीत वांढेकर यांच्याकडे या संदर्भात लेखी हरकती दाखल करण्यात आल्या आहेत.

नागरदेवळे जिल्हा परिषद मतदार यादीत सुमारे २,६७१ मतदारांची नावे दुबार आढळली असून, ही नावे दोन्ही गटांमध्ये जेऊर आणि नागरदेवळे या ठिकाणी नोंदवली गेली आहेत. त्यामुळे मतदानाच्या वेळी दुबार मतदानाची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच पंचायत समिती गण ९५ व केकती गण ९६ च्या प्रारूप यादीत १,६३१ दुबार नावे असल्याचे निदर्शनास आले आहे. तक्रारदारांनी या सर्व यादींचे सखोल सर्वेक्षण, पुनर्तपासणी आणि योग्य ती सुधारणा करण्याची मागणी केली आहे.

मतदार याद्यांतील त्रुटी दूर न झाल्यास आगामी निवडणुकांची पारदर्शकता धोक्यात येईल, असा इशारा तक्रारदारांनी दिला आहे. संविधानाचे पावित्र्य राखण्यासाठी, उमेदवार आणि मतदारांची फसवणूक टाळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालून चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. प्रशासनाने तातडीने सखोल तपासणी करून जबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी व पारदर्शी मतदार यादी तयार करण्याच्या स्पष्ट सूचना द्याव्यात, असेही तक्रारदारांचे म्हणणे आहे.

# विजेच्या लपंडावामुळे पाण्याचा प्रश्न प्रश्न गंभीर; सणासुदीत नागरिक त्रस्त



विजेचा लपंडाव पाणी पुरवठ्याच्या प्रश्नासंदर्भात निवेदन महावितरण कार्यालयाला देताना मनोज कोतकर. (छाया - लहू दळवी)

**माजी सभापती मनोज कोतकर यांचे महावितरण कार्यालयाला निवेदन**

नगर - ऐन सणासुदीच्या काळात केडगाव उपनगरात विजेच्या लपंडावामुळे पाणी पुरवठा विस्कळीत झाला असून नागरिकांना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दिवाळीसारख्या प्रकाशोत्सवाच्या काळात पाण्याचा तुटवडा निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी मनपा स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी महावितरण कार्यालयावर टीका केली असून, तातडीने पाणीपुरवठा आणि विजेचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली आहे.

महावितरण कार्यालयाकडून नागरिकांना कुठलीही पूर्वसूचना न देता वारंवार वीजपुरवठा खंडित केला जात आहे. मुळा धरण, विळद व नागपूर येथील महापालिकेच्या वितरण व्यवस्थेचा वीजपुरवठा खंडित झाल्याने केडगाव उपनगराचा पाणीपुरवठा ठप्प झाला आहे. विशेषतः पाच मिनिटे जरी लाईट गेली तरी पाणीपुरवठा दोन ते चार दिवस पुढे ढकलला जातो, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे केडगावसारख्या विस्तीर्ण आणि लोकवस्ती असलेल्या उपनगरात बाजारपेठेतील व्यापारी, सर्वसामान्य नागरिक तसेच विद्यार्थ्यांनाही अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दिवाळीसारख्या महत्त्वाच्या सणात पाण्याची कमतरता असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

मनोज कोतकर यांनी शहर उपअभियंता चव्हाण यांना निवेदन देत या विषयावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. त्यांनी म्हटले की, देखभाल आणि दुरुस्तीच्या नावाखाली भारनियमन करण्याची पद्धत योग्य नाही. सणासुदीच्या काळात तरी महावितरणने नागरिकांना दिलासा द्यावा. दिवाळी हा प्रकाशाचा सण असून या काळातच विजेचा पुरवठा खंडित करणे म्हणजे नागरिकांच्या आनंदात व्यत्यय आणणे आहे. दिवाळीच्या काळात पाण्याची मागणी अधिक असते, कारण या काळात कुटुंबीय, नातेवाईक, मित्र-परिवार एकत्र येतात. त्यामुळे पाणीपुरवठा अखंडित आणि पूर्ण दाबाने राहणे अत्यंत गरजेचे आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित झाल्याने पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. महावितरण कार्यालयाने तातडीने ठोस पावले उचलून हा प्रश्न निकाली काढावा. केडगावसारख्या शहराच्या मोठ्या उपनगरात अशी परिस्थिती निर्माण होणे ही प्रशासनाच्या निष्क्रियतेचे द्योतक असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. नागरिकांनीही महावितरण कार्यालयाने जबाबदारी घ्यावी आणि स्थिर वीजपुरवठा राखावा, अशी मागणी केली आहे.

# केडगावमध्ये कार पेटविल्याने नुकसान

नगर - घरासमोर अंगणात उभी केलेली मारुती सुझुकी कंपनीची स्विफ्ट डिझायर कार (क्र.एमएच १६ बी एच ५५५२) अज्ञात व्यक्तीने पेटवून देवून नुकसान केल्याची घटना केडगाव उपनगरात शास्री नगर येथे १३ ऑक्टोबर रोजी पहाटे १ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत रेणुका सुनिल गडाख (रा. आदिराज किराणा दुकानाजवळ शास्रीनगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या मालकीची कार त्यांनी त्यांच्या घरासमोर अंगणात उभी केलेली होती. १३ ऑक्टोबर रोजी पहाटे १ च्या सुमारास एक लाल रंगाची कार तेथे आली. त्या कार मधील व्यक्तीने फिर्यादी यांच्या कारला आग लावली. या आगीत कारचे मोठे नुकसान झाले असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात लाल रंगाच्या कारचालकाविरुद्ध बीएनएस कलम ३२६ (फ) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# चेन स्नॅचिंग करणारा सराईत गुन्हेगार 'कुबड्या' ला ठोकल्या बेड्या; १.८० लाखांचा मुद्देमाल जप्त, १४ गुन्हे दाखल असल्याचे आले समोर

नगर - नगर शहर परिसरात महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसका मारून पळविणारा सराईत गुन्हेगार किरण उर्फ कुबड्या दशरथ पालवे (वय २५, रा. नागापुर) याला तोफखाना पोलिसांनी पकडले असून त्याच्या कडून चोरलेले १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र व गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा १ लाख ८० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.



चेन स्नॅचिंग करणारा सराईत गुन्हेगार 'कुबड्या' ला पकडल्यानंतर त्याच्या समवेत तोफखाना पोलिसांचे पथक.

याबाबतची माहिती अशी की, २५ सप्टेंबर रोजी सौ. लिलाबाई गोरख सायकड (वय ६६, रा. आसरा सोसायटी, गुलमोहर रोड) या सकाळी ७.३० च्या सुमारास एकविरा चौक, ते पारिजात चौकाकडे जाणा-या रोडवर सिध्देश्वर कॉलनी येथे पायी घरी जात असताना मोटार सायकलवर आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांच्या गळ्यातील १२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र बळजबरीने हिसका मारुन ओढुन तोडून नेले होते. याबाबत तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी गुन्हे शोध पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांना गुन्ह्याचा सखोल तपास करणेबाबत आदेश दिल्याने उपनिरीक्षक चाहेर यांनी तात्काळ घटना ठिकाणी जावून पाहाणी करुन तपासाची चक्रे फिरवली असता सदर गुन्हा हा सराईत सोनसाखळी चोर किरण उर्फ कुबड्या दशरथ पालवे याने केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे त्याला नागापूर परिसरात ताब्यात घेवून त्याच्याकडे विचारपुस केली असता, त्याने सदरचा गुन्हा हा त्याचा मित्र महेश बाबासाहेब आरु (रा. नागापुर) याच्यासोबत केल्याची कबुली दिली. तसेच नमुद गुन्ह्यातील चोरी गेलेला १ लाख २० हजार रुपये किंमतीचा १२ ग्रॅम वजनाचा सोन्याचा मुद्देमाल व ६० हजार रुपये किंमतीची एक मोपेड मोटार सायकल असा एकुण १ लाख ८० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी किरण उर्फ कुबड्या दशरथ पालवे याचेवर विविध प्रकारचे १४ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई पो. नि.आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर, पो.हे.कॉ सुनिल चव्हाण, नितिन उगलमुगले, भानुदास खेडकर, योगेश चव्हाण, अब्दुल इनामदार, सुरज वाबळे, सुधीर खाडे, पो.कॉ सुमित गवळी, अविनाश बर्डे, सतिष त्रिभुवन, बाळासाहेब भापसे, भागवत बांगर, सुजय हिवाळे, दादासाहेब रोहकले तसेच दक्षिण मोबाईल सेलचे राहुल गुंड यांनी केली आहे.

# शेतातील झाडाला गळफास घेत एका जणाची आत्महत्या

नगर - शेतातील झाडाला गळफास घेऊन एकाने आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील उक्कडगाव शिवारात १४ ऑक्टोबर रोजी सकाळी उघडकीस आली. नंदकुमार भगवान उकिर्डे (वय ५५, रा. उक्कडगाव, ता.नगर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

नंदकुमार उकिर्डे हे त्यांच्या शेतातील एका झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. त्यांना त्यांचे नातेवाईक वसंत भगवान उकिर्डे यांनी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. कोल्हे यांनी त्यांना तपासून ते औषधोपचारापूर्वीच मयत झाले असल्याचे घोषित केले.याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# नरेंद्र शिरसाठ यांचे हृदयविकाराने निधन



नगर - बुऱ्हाणनगर येथील रहिवासी नरेंद्र (बाळू) पद्माकर शिरसाठ (वय ४५) यांचे १४ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे आई, पत्नी, १ मुलगी, बहीण, मेहुणे असा परिवार आहे. राजेंद्र शिरसाठ यांचे ते बंधू होत.

# सदाशिव सोनार यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - खोसपुरी येथील रहिवासी सदाशिव माधव सोनार (वय ८०) यांचे १३ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर खोसपुरी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. खोसपुरी येथे त्यांनी पोस्टमन म्हणून ३५ वर्षे सेवा केली. त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. खोसपुरी येथे ते 'काका' या नावाने परिचित होते. माजी शिक्षण विस्तार अधिकारी चंद्रकांत सोनार तसेच प्रा. सुनील सोनार यांचे ते वडील होत.



गुलमोहर रोड व सावेडी उपनगरातील भटक्या कुत्र्यांना पकडण्यासाठी मनसेचे प्रवीण गायकवाड यांनी आयुक्तांना निवेदन दिले आहे.

# भटक्या कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त करा अन्यथा 'आंदोलन' : मनसेचा इशारा

नगर - अहिल्यानगर शहरातील नवीन प्रभाग क्रमांक ३ मधील गुलमोहर रोड भागातील वीर सावरकर मार्ग तसेच सावेडी उपनगर व सावेडी गाव परिसरात भटक्या कुत्र्यांचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. लहान मुले, विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिक यांच्यावर या भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याचे अनेक प्रकार या भागात घडले आहेत, त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, त्यामुळे परिसरातील कुत्र्यांना पकडण्यात यावे, याबाबतचे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने अहिल्यानगर महापालिका आयुक्तांना दिले आहे.

निवेदनातील मागणीवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, डॉ. संतोष साळवे, अशोक दातरंगे, संकेत व्यवहारे, तुषार हिरवे, प्रकाश गायकवाड, प्रशांत जाधव, आरती उपनाडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**पहा- बदल अर्ज क्र. ५६२/२०२४ (म.सा.वि.व्य.अधिनियम १९५० चे कलम ४९ अ प्रमाणे) दि.११/०६/२०२५ रोजीचा मे. धर्मादाय उपायुक्त साहेब अहिल्यानगर यांचा आदेश.**

## जाहीर नोटीस

**एक**

**तिळवण तेली समाज ट्रस्ट, अहिल्यानगर नोंदणी क्र. अे. ४६३/अहिल्यानगर या न्यासाच्या नवीन नऊ विश्वस्तांची निवडणूक प्रकियेव्दारे सन २०२५ पासून पुढील तीन वर्षाच्या कालावधीसाठी निवड करण्याची कार्यवाही सदरहू न्यासाच्या घटनेतील तरतुदींनुसार व सदर न्यासाकडून प्राप्त झालेल्या कागदपत्रांवरुन निवडणूक घेण्याचे आदेशीत केलेले अहे. सदर निवडणूक घेणेची जबाबदारी निम्न स्वाक्षरीकार ॲड. अजिनाथ जगन्नाथ जायभाय यांचेकडे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सोपविण्यात आलेली आहे. या निवडणुकीत न्यासाच्या मंजूर योजनेप्रमाणे ९ विश्वस्त सन २०२५ पासून पुढील कालावधीकरीता निवडून द्यावयाचे आहेत.न्यासाच्या योजनेतील कलम ८ व ९ नुसार गुप्त मतदान पध्दतीने मुदत संपन्यापुर्वी तीन महीने अगोदर घेणे आवश्यक होते. परंतु त्यानंतरचे अधिकार मे. कोर्टाला असून त्यांचे आदेशानुसार निवडणूक घेण्यात येणार आहे.**

**दोन**

| अ.नं. | दिनांक | वेळ | कामाचा तपशील | निवडणूक कार्यालय व निवडणुकीचे स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | १५/१०/२०२५ | सायं.०५.३० | सभासद/मतदार याद्या प्रसिध्द करणे | सर्व कामकाज हे समाजाचे श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर, दाळमंडई, अहिल्यानगर या ठिकाणी पार पडेल. |
| २ | १५/१०/२०२५ ते १९/१०/२०२५ | दु. ०४.३० पर्यंत | सभासद/मतदार याद्यांवर हरकत घेणे | |
| ३ | १९/१०/२०२५ | ०४.३० ते ६.०० | सभासद / मतदार यादयावरील हरकती स्विकारणे व प्राप्त आक्षेपावर सुनावणी व अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे. | |
| ४ | २०/१०/२०२५ | सकाळी १०.३० ते सायं.५.३० | नामनिर्देशन /उमेदवारी अर्ज भरणे. | |
| ५ | २१/१०/२०२५ | सायं ४.३० ते ५.३० | नामनिर्देशन/ उमेदवारी अर्ज माघारी घेणे, नामनिर्देशन/ उमेदवारी अर्ज छाननी करणे व उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे. | |
| ६ | २१/१०/२०२५ ते २५/१०/२०२५ | सायं ५.३० ते सायं.५.३० | प्रचार करणे. | |
| ७ | २६/१०/२०२५ | सकाळी ९.०० ते सायं.४.०० | मतदान | |
| ८ | २६/१०/२०२५ | सायं.४.०० ते मतमोजणी संपेपर्यंत | मतमोजणी व निकाल जाहीर करणे. | |

तीन-सदर निवडणूक कामी अर्जदार व मतदार यांनी सहकार्य करावे.
दि.१४/१०/२०२५, अहिल्यानगर

**ॲड. अजिनाथ जगन्नाथ जायभाय** (निवडणुक निर्णय अधिकारी)
तिळवण तेली समाज ट्रस्ट, अहिल्यानगर, म्युनि. हाऊस नं २३९२,
श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर, दाळमंडई, अहिल्यानगर, मो. ८००७३९४२४१/९४०३५२६३८६

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### सांभाळा डोळ्यांचे आरोग्य

आरोग्याच्या बाबतीत, क्वचितच हे लक्षात येते की आपण दुर्लक्षित केलेली काही सामान्य लक्षणे खरोखरच गंभीर आजार होण्याचा धोका दर्शवू शकतात. डोळ्यांच्या आतील काही बदल देखील आजारांना सूचित करतात. कधीकधी झोपेचा अभाव किंवा जास्त स्क्रीन वेळ यामुळे थकलेल्या डोळ्यांमुळे धूसर दृष्टी येते. तथापि, मधुमेही देखील अनेकदा या लक्षणाची तक्रार करतात, जे बहुतेकदा रक्तातील साखरेच्या पातळीत बिघाडामुळे होते. तथापि, हे मोतीबिंदू किंवा मॅक्युलर डीजनरेशनचे लक्षण देखील असू शकते. जर तुम्हाला तुमच्या डोळ्यांभोवती पांढरा कडा दिसला तर ते उच्च कोलेस्टेरॉल पातळीचे लक्षण असू शकते. जरी हे उघड्या डोळ्यांना दिसत नसले तरी, नियमित भेटी घेतल्यानंतर नेत्ररोगतज्ज्ञांना ते लक्षात येऊ शकते. वय वाढल्यामुळे किंवा उच्च एलडीएल (कमी घनता असलेल्या लिपोप्रोटीन) पातळीमुळे देखील हे विकसित होऊ शकते जे स्ट्रोकचा धोका दर्शवते.

## पाककला

### मालपुवा

**साहित्य :** २ ते तीन टेबलस्पून बारीक रवा, १/२ वाटी मैदा, १ वाटी गव्हाचे पीठ, १ वाटी साखर, १ टेबल स्पून वेलची पूड, १ टेबलस्पून सोप पावडर, केशर, १ वाटी दूध, १ वाटी तूप,

कृती : सर्वप्रथम आपण मालपोळ्यासाठी लागणारा पाक तयार करून घेऊयात पाक म्हणजे एक तारी किंवा दोन तारी नव्हे तर जेवढी साखर घेतली आहे त्याच्या निम्मे पाणी घालून ही साखर विरघळेपर्यंत उकळायचे आहे व त्यानंतर किमान दोन मिनिटे उकळून गॅस बंद करायचा आहे त्यामध्ये केशर वेलची पूड ही घालायची आहे. आता मालपुवासाठी लागणारे रवा मैदा आणि गव्हाचे पीठ एकत्र करून घ्यायचे आहे. चिमूटभर मीठ घालायचं त्यानंतर त्यामध्ये सौंफची पावडर किंवा भरड घालायची आहे हे सर्व आधी कोरडे चमच्याने मिक्स करून घ्यायचे आणि नंतर त्यात दूध घालून हळूहळू त्याचे छान डोशाप्रमाणे बॅटर तयार करायचे आहे. हे बॅटर तयार करून दहा ते पंधरा मिनिटं किंवा अर्धा तास झाकून ठेवायचे आहे त्यानंतर तूप कढईमध्ये गरम करायचे आहे कढई पसरट असावी किंवा तुम्ही पॅनही घेऊ शकता तूप चांगले गरम झाल्यानंतरच त्यात मालपुवाचे बॅटर चमच्याने गोलाकार सोडायचे आहे पुरीचा आकार येईल एवढे बॅटर घातल्यानंतर ते एका बाजूने चांगले भाजू द्यायचे आहे त्याला चॉकलेटी रंग आल्यानंतर त्याला पलटावे दोन्ही बाजूनी छान चॉकलेटी रंगावर या पुऱ्या परताव्यात त्यानंतर त्या तेलातून काढून पाकामध्ये घालायचे आहेत आणि दोन्ही बाजूंनी भिजवायचे आहेत आणि मग त्या बाहेर काढून ठेवाव्यात अशा सर्व पुऱ्या झाल्यानंतर त्याच्यावरती ड्रायफ्रूट किसावेत.

## वास्तू

* विवाहित स्त्रीने पूजा करताना कधीही चंदनाचा तिलक लावू नये त्याऐवजी कुंकू लावावे.

* मुख्य दरवाजावर फुलाचे तोरण एक दिवसाच्या वर ठेवू नये. याने फुल सुकल्या नंतर त्यातून घरात नकारात्मकता पसरते.

* प्लॉटचा आकार हा सुरुवातीस मोठा, पण नंतर कमी कमी होत जातो. म्हणजेच सुख कमी होत जाणार. म्हणून हा प्लॉट काही तज्ज्ञांच्या मते अशुभ आहे.

## सल्ला

रोज रात्री झोपण्यापूर्वी नाकात दोन थेंब मोहरीचे तेल टाकल्यास पोट कधीच बाहेर येत नाही आणि शरीराचे संतुलन टिकून राहते.

## सौंदर्य

गुलाब पाण्यामुळे त्वचेवरील जास्तीचे तेल निघून जाते आणि त्वचेचा पीएच बॅलन्स सुधारतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १६ ऑक्टोबर २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, आश्लेषा १२।४२, सूर्योदय ०६ वा. ३४ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : भविष्यात त्यांचा उपयोग होईल. सरकारी कामे सफल होतील. व्यवसाय क्षेत्रात अधिकारी व सहकारी नकारात्मक वागतील.

**वृषभ** : आपल्या सहकार्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करा. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. गृहिणी आज असंतुष्ट राहतील.

**मिथुन** : मोठ्यांचा सहवास लाभेल, त्यांना भेटून आनंद होईल. दूर किंवा विदेशात असलेल्या संततीच्या शुभवार्ता मिळतील.

**कर्क** : विशेषतः धंदा-व्यवसाय करणाऱ्यांना आज फारच लाभदायक दिवस आहे. मित्राच्या भेटीतून आनंद मिळेल.

**सिंह** : भेटीचे योग येतील. अचानक धनलाभ संभवतो. प्रवास होतील. काम करायला उत्साह वाटणार नाही.

**कन्या** : रागावर आज संयम ठेवावा लागेल. खर्च अधिक होईल. कुटुंबियांबरोबर संघर्ष होणार नाही याकडे लक्ष द्या.

**तूळ** : आज नवीन कामे सुरू करू नका. नवे परिचय सुद्धा लाभदायी होणार नाहीत.

**वृश्चिक** : शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभेल. आर्थिक लाभ होईल. आजारी व्यक्तीच्या प्रकृतीत सुधारणा होईल. मातृचिंता सतावेल.

**धनु** : प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. चर्चा- वादविवाद यातही तुमचा प्रभाव राहील. कष्टाच्या मानाने यश संतोषजनक नसेल.


**मकर** : हा वेळ आपल्या एखाद्या आवडीच्या व्यक्तीबरोबर घालवू शकता. आपल्या सर्जनशीलतेला प्रेरणा मिळेल.

**कुंभ** : आपल्या जुन्या लोकांना किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे यावेळी आपल्यासाठी फलदायी आहे.


**मीन** : जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२८५ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२८४ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) छत्रपती शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ सुपुत्र ७) दुर्दशा; दैना ८) जीवित; आयुष्य; उमर; पाणी १०) हक्क; फिर्याद; दुष्मनी; शत्रुत्व ११) विष्णूचे एक नाव १३) नांगर १६) आपत्ती; विपदा; बला १७) बाण सोडल्यानंतर धनुष्याच्या दोरीचा येणारा आवाज १९) मक्केतील मुस्लिमांचे एक पवित्र स्थान २१) धरती; धरणी; वसुधा; पृथ्वी २२) वेल; वल्लरी २४) मांडणी; व्यवस्था २७) नगरपालिकेवर निवडून गेलेला लोकप्रतिनिधी

**उभे शब्द :-** १) संपत्ती; धन २) ओझे वाहणारा; हमाल ३) चेतना; प्राण; साप ४) मातीचे भांडे; गाडगे ५) एक फूल; कमळ; पंकज ६) एक धान्य; यव; सातू ९) नूतन; नवीन १२) गाडा; गाडी; वाहन १४) खोटा; लुच्चा; लबाड १५) आदर; सन्मान; गौरव १६) गोळा करणे; जमविणे १८) एक शास्त्र; केमिस्ट्री २०) बाळाला नाव देण्याचा विधी; नामकरण २३) या पिकापासून गोणपाट तयार होते २५) स्वाद; रस; गोडी २६) श्वासोच्छ्वास करण्याचे इंद्रिय; घ्राणेंद्रिय

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : कर्म जेव्हा वसुलीला येते तेव्हा कोणताच वशिला चालत नाही परतफेड करावीच लागते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### लहान मुलांमध्ये विचार करण्याची क्षमता असते का?

नाही, लहान मुले विचार करू शकत नाहीत. विचार करण्याची क्षमता हळू हळू विकसित होते आणि मुलांमध्ये ती पूर्णपणे विकसित होण्यासाठी काही वर्षे लागतात.

लहान मुले हळू हळू गोष्टी शिकतात आणि समजून घेतात. जन्माच्या वेळी त्यांची दृष्टी खूप अस्पष्ट असते आणि त्यांना फक्त आकार, प्रकाश आणि हालचाल दिसते. जसजसे ते मोठे होतात, त्यांची दृष्टी सुधारते आणि त्यांना रंग दिसू लागतात. दोन महिन्यांच्या बाळाला लाल रंगाचा पाळणा आवडतो, असे एका अभ्यासात दिसून आले आहे.

चार महिन्यांच्या बाळाला वस्तूंची जागा, आकार शोधायला शिकायला लागते. पाच महिन्यांच्या बाळाला लहान वस्तू शोधणे आणि हलणाऱ्या वस्तूंचा मागोवा घेणे सोपे होते.

आठ महिन्यांपर्यंत, त्यांची दृष्टी त्यांच्या पालकांसारखीच चांगली होते.

विचार करणे, समस्या सोडवणे आणि तर्क करणे यांसारख्या गोष्टी मुलांमध्ये हळू हळू विकसित होतात. त्यामुळे, लहान मुले लगेच विचार करू शकत नाहीत, पण ती हळू हळू शिकत असतात.

### श्वेतराजाचा उद्धार

त्रेतायुगात एक फार मोठे वन होते. एकदा अगस्ती मुनींनी त्या वनातील आश्रमात एक रात्र वास्तव्य केले. दुसऱ्या दिवशी सकाळी आश्रमाबाहेर रस्त्यात त्यांना एक प्रेत पडलेले दिसले. ते कुणाचे, असा विचार मुनी करत होते तेव्हाच एका विमानातून एक दिव्य मनुष्य तेथे आला व त्या प्रेताचे मांस खाऊ लागला. अगस्तींनी त्याला याचे कारण विचारले असता तो म्हणाला, पूर्वकालात विदर्भदेशी माझा पिता वसुदेव राजा होता. मी त्यांचा मोठा मुलगा श्वेत व मला सुरथ नावाचा लहान भाऊ होता. पित्याच्या मृत्यूनंतर मी राजा झालो. बरीच वर्षे यशस्वीपणे राज्य केल्यावर मला वानप्रस्थाश्रमात जाऊन तपस्या कराविशी वाटू लागले, म्हणून सुरथाला राज्यावर बसवून मी वनात जाऊन उग्र तप केले. त्याच्या प्रभावाने मला ब्रह्मलोकाची प्राप्ती झाली. पण तेथे गेल्यावर मी सतत तहानभुकेने तळमळत असे. याचे कारण विचारल्यावर ब्रह्मदेव म्हणाले,

हा लोक भूकतहानविरहित असला तरी पृथ्वीवर काहीतरी दान केल्याखेरीज इथे काहीच खायला मिळत नाही. तू राजा असताना कुणाला भीकही दिली नाहीस, अतिथीला जेवण दिले नाहीस, म्हणून तुला तहानभुकेचे कष्ट पडतात. तुझे शरीर पृथ्वीवर पडलेले आहे, त्याचे मांस खाऊन तृप्त हो. तुझे शरीर अक्षय आहे. शंभर वर्षांनी अगस्तीमुनी तुझे हे संकट दूर करतील.

राजा श्वेताची ही कथा ऐकून अगस्तींनी आपली ओळख सांगितली. राजा त्यांना शरण आला. मुनींनी त्याची त्या घृणास्पद आहारापासून मुक्तता केली. आपला उद्धार केल्याबद्दल राजाने मुनींना एक दिव्य आभूषण कृतज्ञतापूर्वक भेट दिले. त्यांनी दान म्हणून त्याचा स्वीकार केला.

पुढे श्रीराम अयोध्येस राज्य करीत असता एकदा अगस्तींच्या दर्शनासाठी गेले होते, तेव्हा त्यांनी ते विश्वकर्म्याने बनवलेले दिव्य आभूषण रामांना अर्पण केले. प्राप्त झालेल्या वस्तूचे पुन्हा दान देण्याने महान फलाची प्राप्ती होते, असे सांगत अगस्तींनी ते घेण्याचा रामाला आग्रह केला. राजा हा इंद्र, वरुण, कुबेर, यम यांचा अंश असून तो प्रजेचा उद्धार करतो. आपलाही उद्धार व्हावा म्हणून हे आभूषण तू घ्यावंस, असे अगस्तींनी श्रीरामांना सांगितल्यावर रामाने त्याचा नम्रतेने स्वीकार केला.

## जीवन का अमृत (भाग १)



### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

किसी शारीरिक या मानसिक तनाव के आँखे बंद कर लें तथा शरीर और वातावरण के ख्याल, साँस का या अन्य कोई और ख्याल, सभी छोड़ दें। आप अपनी दृष्टि दो भौहों के बीच, जो कुछ भी आप देखें, उसके मध्य में टिकाए और सतनाम शब्द का जाप बहुत धीरे-धीरे, मन ही मन करें, चाहे रुक-रुककर, ताकि आपकी आंतरिक दृष्टि में कोई विघ्न न पड़े। इस शब्द का जाप काल के किसी भी बुरे असर को दूर कर देगा। यदि आप प्रकाश देखें, तो यह और तीव्र होता जाएगा; अंत में यह फूट जाएगा और आगे का रास्ता दे देगा। यदि आप सत्गुरु के नूरी स्वरूप को देखें, जैसा कि आपने पहले देखा है, तो आप अपना ध्यान पूरी तरह उसके चेहरे पर टिकाएँ, इतना कि आप अपने आपको भूल जाएँ। इस प्रकार, आपमें ग्रहणशीलता का विकास होगा और सत्गुरु आपसे बातें करेगा।

अपने कानों को अँगूठों से बंद करके बैठो। केवल उस आवाज़ को सुनो जो कि दायी ओर से आती हो। वह आवाज़ पास आ जाएगी, तीव्र हो जाएगी और अंत में ऊपर से आना शुरू कर देगी और इसे बिना कान बंद किए भी सुना जा सकेगा। आपको आवाज का पीछा नहीं करना, जहाँ से वह आ रही हो, अन्यथा आवाज़ मध्यम पड़ जाएगी और धीरे-धीरे खत्म हो जाएगी। आप एक से ज्यादा प्रकार की आवाजें सुनेंगे, पर आप बड़े घंटे, शंख, बादल की गर्जन, मृदंग, वायलिन और बाँसुरी की आवाज़ पर ध्यान दें, जो कि उच्चतर किस्म की आवाजे हैं और शेष को छोड़ दें।

किनारे वाला नीला धब्बा दिखाई देता है, उसके बीच में देखना चाहिए और मन ही मन सिद्ध नामों का जाप करना चाहिए, बहुत धीरे-धीरे, चाहे रुक-रुककर, ताकि आंतरिक दृष्टि में कोई विघ्न न पड़े। ज्योति तीव्र और स्थिर हो जाएगी और अंत में फूटकर आगे का रास्ता दे देगी। आपने शब्द धुन को सुनने के बारे में कुछ नहीं लिखा, जो कि इतनी ही जरूरी है। श्रुति की धारा को, जो कि दायीं ओर से आती है, नियमित रूप से सुनना चाहिए। यह तीव्र हो जाएगी, पास आ जाएगी और अंत में ऊपर से आती सुनाई देगी। मुझे खुशी है कि आप भजन सिमरन में प्रेम पूर्वक समर्पित हैं, जिसके फलस्वरूप आप ध्यान में सत्गुरु के नूरी स्वरूप का आशीर्वाद पाते हैं और सत्गुरु की दया से घंटियों की पवित्र आवाज़ सुनते हैं, जो कि दायी ओर से आती है । जिंदा सत्गुरु को अंतर में देखना एक दुर्लभ आशीर्वाद है। आप दृढ़ता से उसकी चमकदार आँखों और माथे पर देखें तथा अपनी ग्रहणशीलता बढ़ाने का प्रयास करें और मन ही मन सिद्ध नामों का जाप करें,

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

तरंगे निकलने लगती हैं। शांति, प्रेम, सुख, आनंद, दया, उत्साह, खुशी जितने भी सात्विक, राजसिक वा तामसिक भाव उत्पन होते हैं, ये भी सब केन्द्र हैं जिन से जब संकल्प गुजरते हैं तो वैसे ही प्रभाव वातावरण में होने लगते हैं। मन की यह विशेषता है कि आवश्यकता अनुसार अपने अन्दर नये नये यंत्र बनाता और तोड़ता रहता है। ये कार्य दिमाग के विभिन्न भागों में होता रहता है और इन केन्द्रों/यंत्रों का सीधा सम्बन्ध मन से होता है। जब भी मन में दुःख हो तो तुरंत समझ जाओ विचार गलत यन्त्र से गुजर रहे हैं। उसी समय विचार बदलो और उसका उल्टा अच्छा क्या है वह सोचो। जब मन में आने लगे तो समझो विचार अच्छे यंत्र से गुजर रहे हैं।

सकून आज्ञा चक्र -

२७ मन साधना का केन्द्र

हमारे दिमाग में जिस स्थान पर भगवान को याद करते हैं वह एक केन्द्र है जिस में ऐसी तरंगे बनती हैं जो भगवान तक पहुंचती हैं। अभ्यास से ये केन्द्र मजबूत बनता है और उससे ऐसी तरंगे निकलती हैं जो निरंतर हमें भगवान की याद आती रहती है। योग के समय ये तरंगे कैसे चलती है कोई नहीं जानता। ये तरंगे एक सिस्टम से चलती हैं। सिर में पतालू वाले स्थान पर जो बच्चे के जन्म के समय कोमल होता है, वहां शक्ति का केन्द्र/यंत्र होता है जिसे सहस्त्रार कहते हैं। इस सहस्त्रार में वह तरंगे बनती हैं जो भगवान तक पहुंचती हैं। यह तरंगे बहुत शक्तिशाली होती हैं। सहस्त्रार का यह भाग आज्ञा चक्र से नियंत्रित होता है। भगवान को तरंगे भेजने का अनटीना हमारे नाक के अन्दर है जहां नाक की हड्डी बढ़ जाने पर आपरेशन करवाते हैं।

यहां एक बहुत छोटा सा सुराख होता है बस इसी सुराख में अनटीना होता है। जहां से तरंगे भगवान के पास आती जाती हैं। ये अनटीना स्थूल शरीर में नहीं इसके अंदर सूक्ष्म शरीर है उसमें होता है। यह तरंगे आकाश में यों सीधी नहीं जाती। राकेट की तरह गोल गोल घूमती हुई चलती हैं। हमारे मन से निकली तरंगे घुमती हुई पृथ्वी के उत्तरी ध्रुव पर जाती हैं। वहां से तरंगे सूर्य के पास जाती हैं। सूर्य से तरंगे भगवान के पास जाती हैं। भगवान से शक्ति इसी रास्ते से हमें वापिस प्राप्त होती है। टी. वी. डिश छतरियों का मुंह सूरज की ओर रखा जाता है क्योंकि सूर्य स्थिर है और वहां से सिगनल लगातार प्राप्त कर सकते हैं तथा पृथ्वी के साथ घूमते हुये छतरी की दिशा सदा सूर्य की ओर रहती है। हमारे विचार उतरी ध्रुव से होते हुए भगवान तक आते जाते हैं। उत्तर दिशा की ओर मुंह करके योग लगाये तो तरंगों के आने जाने में सुविधा होगी। हम चाहे मुंह किसी भी दिशा की ओर कर के बैठें, तरंगे इसी रास्ते से जायेंगी।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

हॉटेलमध्ये जेवण झाल्यावर
पत्नी : अहो, वेटरला काही तरी टिप द्या
पती : लग्न करू नको रे बाबा!!!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कोणता शौर्य पुरस्कार सर्वोच्च मानला जातो?

\- अशोक चक्र

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### पाळणाघर

* पाळणाघराच्या संचालिकेला मुलांचे मानसशास्त्र, शारीरिक प्रगती व आहारशास्त्राचे नियोजन याबद्दलची माहिती असणे आवश्यक आहे.

* लहान मुलांची रोगप्रतिकारक शक्ती कमी असल्यामुळे अनेक वेळा लहान मूल पाळणाघरात आजारी पडते. मूल आजारी पडल्यानंतर त्याची तपासणी करण्यासाठी पाळणाघराशी संबंधित डॉक्टरांची नियमित तपासणी भेट आहे का. हे पाहून घ्यावे. कारण मुलांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी डॉक्टरांची व्हिजिट गरजेची आहे.

* पाळणाघरात आपल्याला मूल किती वेळ ठेवायचे आहे, आपल्या नोकरीची वेळ व तेथे मूल ठेवण्याची वेळ यांची सांगड घालता येते का, हे पाहावे. कारण काही पाळणाघरे ही अर्ध वेळ सकाळी १० ते ६ चालणारी असतात, तर काही पाळणाघरे ही दिवसभरासाठी असतात. ही सर्व चौकशी करूनच मुलांना पाळणाघरात ठेवावे.

* पाळणाघर कसे दिसते हे महत्त्वाचे नसून, तेथे गेल्यावर तुम्हाला आणि तुमच्या मुलाला आपलेसे वाटेल ते पाळणाघर नक्कीच चांगले.

* तेथील संचालिका, कर्मचारी व शिक्षिका तुमच्याशी कसे बोलतात-वागतात, याचा अंदाज घ्यावा. * मुल बोलण्याच्या वयातील असेल, तर घरी आल्यावर आज पाळणाघरात काय काय केले, हे विचारावे. मुलाबरोबर चर्चा केल्याने मूल पाळणाघरात आनंदी आहे की नाही, हे तुमच्या लक्षात येते.

**पाळणाघराचे फायदे :**

* मुलांना पाळणाघरात ठेवल्यास तेथील चांगल्या वातावरणात मुलांना लहान वयातच शिस्त व स्वच्छतेचे धडे मिळतात.

* इतर मुलांमध्ये मिसळण्याची कला ते लवकर अवगत करतात.

* शिशुवर्गात प्रवेश घेण्यापूर्वीच त्यांची शैक्षणिक जीवनाची पूर्वतयारी करून घेतली जाते. त्यामुळे त्यांचा भावी जीवनाचा पाया मजबूत होतो.


* मुलांमध्ये असणारी छंद, कलाकौशल्ये यांचा विकास होऊन बौद्धिक क्षमता वाढते.

* पाळणाघरात राहिल्यामुळे मोठ्यांशी व इतर मुलांशी कसे वागावे, याची कला ते शिकतात.

**आई-वडिलांची दक्षता :** पाळणाघरात मुलांना सोडताना मुले रडुन गोंधळ घालतात. अशावेळी त्यांचे मन तेथील खेळण्यात रमवून तुम्ही तेथून लवकर बाहेर पडा. सुरुवातीला तुम्हाला त्रासदायक काम मुलांना सवय झाल्यावर आपोआप पाळणाघरात रमतात. महिन्यातून एखाद्या सुट्टीच्या दिवशी पालकांनी मुलांसोबत पाळणाघरात वेळ घार तेथील वातावरणाचा, कामाचा अंदाज येईल व तुमच्या मुलासोबत इतरही मुलांना आधार मिळेल. तेथील मुलांसोबत गप्पागोष्टी, चित्रकला, संगीत आपल्याला, आवड आहे तो विषय मुलांना शिकवावा.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे महिला महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा उद्घाटन समारंभात बोलताना प्रणेशा कोल्हे.

# पर्यावरणपूरक दिवाळी व इको क्लबची 'समर्थ विद्या'मध्ये स्थापना, प्रदूषणमुक्त व शांत दिवाळी साजरी करण्याचा विद्यार्थ्यांचा निर्धार

### पर्यावरणाचे रक्षण करणे ही आजच्या काळाची गरज : मुख्याध्यापिका तथा प्राचार्या श्रीमती संगीता जोशी

नगर – सावेडीतील श्री समर्थ विद्यामंदिर (माध्यमिक विभाग) प्रशालेत दिवाळी सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी फटाके न फोडता आणि फक्त आकाशकंदील लावून दिवाळी साजरी करण्याची शपथ घेतली. प्रदूषणमुक्त आणि शांत दिवाळी साजरी करण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी उत्साहात केला.

शाळेत इको क्लबची स्थापना करण्यात आली. या क्लबचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करणे, प्रदूषणविरहित सण साजरे करण्याची सवय लावणे आणि हरित जीवनशैलीचा प्रसार करणे हा आहे. क्लबमार्फत वृक्षारोपण, कचरा व्यवस्थापन, पाण्याची बचत आणि पुनर्वापर यासारखे उपक्रम राबविण्याचे ठरविण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्याध्यापिका तथा प्राचार्या श्रीमती संगीता जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक करत सांगितले की, पर्यावरणाचे रक्षण करणे ही आजच्या काळाची गरज आहे. विद्यार्थी जर अशा पद्धतीने पुढाकार घेत असतील, तर समाजात नक्कीच सकारात्मक बदल घडेल.



सावेडीतील श्री समर्थ विद्यामंदिर (माध्यमिक विभाग) प्रशालेत पर्यावरणपूरक दिवाळी व इको क्लबची स्थापना करण्यात आली.

शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांचा या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग होता. विद्यार्थ्यांनी हस्तनिर्मित आकाशकंदील तयार करून शाळेच्या परिसरात सजावट केली. फटाक्यांमुळे होणारे ध्वनी व वायू प्रदूषण टाळण्यासाठी सर्वांनी एकमताने फटाके मुक्त आणि हरित दिवाळी साजरी करण्याची शपथ घेतली.

अखेर कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी स्वच्छ दिवाळी – हरित दिवाळी – सुरक्षित दिवाळी या घोषवाक्याने वातावरण दुमदुमविले. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमामुळे समाजात पर्यावरणाबाबत जागरूकतेचा एक सुंदर संदेश पोहोचला. या कार्यशाळेसाठी प्राचार्या संगीता जोशी, एल. एम. कुलकर्णी, सौ. अनुराधा शास्त्री, विवेक भारताल, सौ. मनीषा अंबाडे, संकेत शिंदे, सुनील रायकर, स्वाती घुले यांनी मार्गदर्शन केले.

## स्वत:मधील सुप्त क्षमता ओळखून परिश्रम करणे हेच यशाचे गमक

### प्रणेशा कोल्हे यांचे प्रतिपादन

नगर – रयत शिक्षण संस्थेच्या राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहिल्यानगर येथे स्पर्धा परीक्षा उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राद्वारे करण्यात आले होते. आजच्या स्पर्धेच्या युगात अनेक विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षामध्ये यश संपादन करून आपले भविष्य उज्वल करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. पण या कठीण प्रवासात केवळ पुस्तकी ज्ञान किंवा दीर्घ तासांचा अभ्यास पुरेसा नाही तर स्वतःमधील सुप्त क्षमता ओळखून त्यासाठी कठीण परिश्रम करणे हाच यशाचा मार्ग आहे, असे प्रतिपादन प्रणेशा कोल्हे यांनी केले.

उपप्राचार्य डॉ. भूपेंद्र निकाळजे यांनी स्पर्धा परीक्षेचे महत्त्व अधोरेखित केले.

प्रास्ताविक प्रा. विष्णू अडसरे यांनी केले. परिचय प्रा. अंबादास गोरे यांनी करून दिला. तसेच' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाणिज्य विभागप्रमुख डॉ. शुभांगी ठुबे यांनी केले. प्रा. प्रशांत रोहोकले यांनी आभार मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनींची उपस्थिती होती.



अहमदनगर महाविद्यालयाच्या उद्धव मनीयारने 'इनोव्हफेस्ट' स्पर्धेत चौथा क्रमांक पटकावल्याबद्दल प्राचार्य नोएल पारगे यांनी त्याचे अभिनंदन केले.

## अहमदनगर महाविद्यालयाच्या उद्धव मनीयारने 'इनोव्हफेस्ट' स्पर्धेत पटकावला चौथा क्रमांक

नगर – बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशन अहमदनगर महाविद्यालयातील विभागातील (B.B.A.) तृतीय वर्षातील विद्यार्थी उद्धव राहुल मनीयार, याने Innovfest entrepreneurship summit organised by PUMBA sppu स्पर्धेमध्ये पटकावून यश मिळविले आहे.

व्यवसाय स्टार्ट-अप, नव-कल्पना यांना प्रोत्साहन देण्यासाठी सावित्रीबाई फुले विद्यापीठ ही स्पर्धा आयोजित करत असते. त्या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातून ६९ टीम सहभागी झाल्या होत्या, त्यामधून अहमदनगर महाविद्यालयातील बी.बी.ए. विभागातील तृतीय वर्षाचा उद्धव मनीयार याने अहिल्यानगर जिल्ह्यातर्फे चतुर्थ स्थान पटकावले. त्याने त्याच्या प्रोजेक्टमध्ये प्लास्टिक पासून ड्युरेबेल, एनव्हायरन्मेंट फ्रेंडली ब्रिक्स आणि टाईल्स तयार करण्याचे तंत्र याचे मॉडेल मांडले. ह्या ब्रिक्स आणि टाईल्स वजनाने हलक्या, स्ट्रॉंग, हाताळायला एकदम सोप्या आहेत. तसेच वॉटरप्रूफिंग, फायर रेसिस्टंट आणि टर्माईट रेसिस्टंट आहेत. या प्रसंगी अहमदनगर कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे यांनी त्याचे अभिनंदन केले. विभाग प्रमुख डॉ. तुषीता अय्यर यांनी उद्धवला वेळोवेळी मार्गदर्शन केले आणि त्याचे विशेष कौतुक केले.

## ज्ञानदीप अभियानच्या माध्यमातून पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला नवी दिशा

नगर – राज्यात अलीकडील अतिवृष्टीमुळे अनेक भागांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली असून शेकडो विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य वाहून गेले आहे. वह्या, पुस्तके, पेन, बॅगा यांचा अभाव असल्याने अनेकांचे शिक्षण थांबण्याच्या मार्गावर आहे. या पार्श्वभूमीवर अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन (AMS) या सामाजिक संस्थेने प्रेरणादायी ज्ञानदीप अभियान हाती घेतले आहे. या अभियानाच्या माध्यमातून पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना एक वर्षासाठी दत्तक घेऊन आवश्यक ते सर्व शैक्षणिक साहित्य – वह्या, पुस्तके, बॅग, पेन, कंपास बॉक्स इत्यादी – विनामूल्य देण्यात येत आहे.



पाथर्डी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भट्टीवाडी येथे AMS फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

### अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशनचा उपक्रम; भट्टीवाडी शाळेत साहित्य वाटप

१३ ऑक्टोबर रोजी पाथर्डी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भट्टीवाडी येथे AMS फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य हेच या उपक्रमाचे खरे यश असल्याचे फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ तसेच अचड फाउंडेशनचे अशोक गाडे, संदीप नवसुपे, मनोज सोनवणे, श्रीपाद दगडे, भरत सुंबे, संतोष बेरड, सिद्धांत पानसरे आणि अहिल्यानगर AMS टीम उपस्थित होती.

एका विद्यार्थ्याच्या शैक्षणिक साहित्य किटसाठी अंदाजे ४०० ते ५०० रुपयांचा खर्च येतो. या उपक्रमात महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांमधील AMS सदस्यांनी आर्थिक आणि वस्तू स्वरूपात योगदान दिले आहे. पुढील टप्प्यात मराठवाडा व सोलापूर (माढा) परिसरातील पूरग्रस्त विद्यार्थ्यांपर्यंत देखील ही मदत पोहोचवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

AMS फाउंडेशनकडून सांगण्यात आले की, ही फक्त सुरुवात आहे. जोपर्यंत प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात पुस्तक आणि चेहऱ्यावर हसू दिसत नाही, तोपर्यंत आमचा प्रवास सुरूच राहील.

अधिक माहिती आनंद गुळूमकर ८१८०९ २७७००, मनोज सोनवणे ७५८८० ०४५५१, अशोक गाडे ८८८८८९५८९२, अभिजित डेरे ९६६४२४७०२७, अतुल बिराजदार ७७४३९११७११, राहुल पवार ८१८०९ १३३५५, प्रवीण सपकाळ ९१४६८ ३८४८५. यांच्याशी संपर्क साधावा.

देणगीसाठी अधिकृत खाते: – AKhand Maratha Samrajya Foundation.Union Bank of India, Warje Malwadi Branch, Pune A/c No.: 608902010020688 & IFSC: UBIN0560898

या दिवाळीत फटाके नव्हे, तर ज्ञानाचा दिवा लावूया! पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी एकत्र येऊया! जय शिवराय!...

## सारसनगर येथे बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तूंचे वाटप

### जनकल्याण बहुउद्देशीय संस्थेच्या पाठपुराव्याने मिळाला शासकीय योजनेचा लाभ

नगर – शहरातील सारसनगर येथे बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या ३८ कुटुंबांना गृहपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम जनकल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था सातत्यपूर्ण पाठपुराव्याने इमारत बांधकाम व अन्य कामगार कल्याण मंडळाच्या योजनेंतर्गत राबविण्यात आला. या उपक्रमामुळे बांधकाम कामगार कुटुंबीयांना दिवाळीपूर्वी आनंदाचा क्षण अनुभवायला मिळाला.



सारसनगर येथे बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या ३८ कुटुंबांना गृहपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले.

धडक जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब काळे यांच्या हस्ते सारसनगर येथे सुरु असलेल्या बांधकामस्थळी या वस्तूंचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी जनकल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विनोद साळवे, बांधकाम व्यावसायिक योगेश वामन, धडक जनरल कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर शेलार, संस्थेच्या मालनताई जाधव, दत्ता वामन, तसेच बांधकाम कामगार व त्यांच्या महिला कुटुंबीयांची उपस्थिती होती. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या उपक्रमामुळे अनेक कामगारांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

रावसाहेब काळे म्हणाले की, शासनाने कामगार आणि वंचित घटकांसाठी अनेक योजना राबविल्या आहेत. परंतु त्या योजनांचा लाभ अनेकदा गरजूंपर्यंत पोहोचत नाही. जनकल्याण संस्थेच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करून हा लाभ प्रत्यक्ष कामगार कुटुंबांपर्यंत पोहोचविण्यात आला, ही समाधानाची बाब आहे. वंचितांसाठी केलेले कार्य हे केवळ समाजसेवा नसून राष्ट्रनिर्मितीचे कार्य आहे. समाजातील सक्षम घटकांनी आपल्या परीने कष्टकरी वर्गाच्या मदतीसाठी पुढे येण्याचे त्यांनी आवाहन केले.

विनोद साळवे म्हणाले की, सेवा हाच धर्म, आणि समाजहित हाच आमचा मार्ग या विचाराने जनकल्याण बहुउद्देशीय संस्था काम करत आहे. बांधकाम क्षेत्रातील कामगार हे आपल्या समाजाच्या विकासाचे शिल्पकार आहेत. ते आपले घरे, इमारती, रस्ते बांधतात; परंतु स्वतःच्या कुटुंबासाठी आवश्यक सुविधा मिळविण्यात मात्र मागे राहतात. म्हणूनच शासनाच्या योजनांचा लाभ या कष्टकरी बांधवांना मिळवून देण्यासाठी पुढाकार घेण्यात आला होता. तसेच त्यांच्या आरोग्याबाबतही शिबिर घेऊन त्यांची तपासणी केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## डॉन बॉस्को विद्यालयाच्या विद्यार्थिनींची 'शालेयस्तरीय कराटे'त सुवर्ण कामगिरी

नगर – नुकत्याच शालेय मनपास्तरीय कराटे स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल वाडिया पार्क अहिल्यानगर येथे पार पडल्या. या स्पर्धेमध्ये मनपा अंतर्गत असणाऱ्या अनेक शाळेतील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धा शिस्तबद्ध पद्धतीने पार पडल्या. या स्पर्धेमध्ये डॉन बॉस्को विद्यालयाच्या १७ वर्षाखालील मुलींमध्ये रिया अमोल ग्रीन हिने ४७ किलो खालील वजन गटात तर अनुष्का कैलास जेधे हिने ५७ किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक मिळवून सुवर्ण पदक पटकावले. तसेच १९ वर्षाखालील मुलींमध्ये प्रज्ञा अजित कदम हिने ४२ किलो खालील वजन गटात तर संकल्पिता शंकर खर्डे हिने ७५ किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक मिळवून सुवर्ण पदक पटकावले. या सर्व विद्यार्थिनींची पुढे बारामती येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.



शालेयस्तरीय कराटे स्पर्धेत सुवर्ण कामगिरी करणाऱ्या डॉन बॉस्को विद्यालयाच्या विद्यार्थिनींसह शिक्षक.

या सर्व विद्यार्थिनींना बॉस्को उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शारीरिक शिक्षण शिक्षिका डॉ. शितल कोतकर व विद्यालयाचे शारीरिक शिक्षण शिक्षक सुभाष ब्राह्मणे यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व विद्यार्थिनींचे शाळेचे प्राचार्य फादर अजित मुनिस, रेक्टर फादर रिचर्ड, डिसिल्वा संस्थेचे व्यवस्थापक फादर म्याँवरॉन फर्नांडिस, डॉन बॉस्को इंग्लिश मध्यम शाळेचे प्राचार्य फादर रिचर्ड बुरखाव व शाळेचे सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघ अहिल्यानगर कार्यकारणी जाहीर

### सचिवपदी माणिक नवसुपे, उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर म्हैसमाळे, सहसचिवपदी सिकंदर वाकरे





नगर – राष्ट्रीय चर्मकार महासंघाची अहिल्यानगर जिल्हा कार्यकारणी राष्ट्रीय अध्यक्ष माजी मंत्री बबनराव घोलप यांनी जाहीर केली. अहिल्यानगर जिल्हा सचिवपदी माणिक नवसुपे, उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर म्हैसमाळे, सहसचिवपदी सिकंदर वाखरे, तालुकाध्यक्षपदी अण्णासाहेब केदारे, शहर युवक अध्यक्षपदी अतुल देव्हारे यांची नियुक्ती केली.

माणिक नवसुपे, सिकंदर वाकरे, व ज्ञानेश्वर म्हैसमाळे यांनी गेल्या १५ वर्षांपासून अहिल्यानगर चर्मकार समाज वधू वर मंडळाचे उत्कृष्ट काम केले असून समाज बांधवांना एकत्र आणले आहे त्यांच्या या कार्याच्या अनुभवाचा फायदा राष्ट्रीय चर्मकार महासंघाला होणार आहे. चर्मकार समाजातील माजी राज्य उपाध्यक्ष राजेंद्र बुंदेले, संतोष उदमले, गणेश गोरे यांनी निवडीबद्दल अभिनंदन केले.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष शिवाजीराव साळवे यांच्यासह समाज बांधवांनी त्यांचा सत्कार केला.



### सावेडी येथील सिव्हील हडको कॉलनी सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमरे

सिव्हील हडको सावेडी रोड, अ.नगर येथील रहिवासी यांचे सुरक्षेसाठी संपूर्ण कॉलनीमध्ये रोड– चौक कव्हरेजमध्ये घेवुन म्हाडा सदनिका धारकांचे प्रेरणा सोसायटीच्या वतीने संपूर्ण कॉलनी परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या उपक्रमाचे उद्घाटन प्रसंगी प्रेरणा सोसायटीचे चेअरमन आनंदराव पिंपरकर, व्हा. चेअरमन पांडुरंग दारकुंडे, सचिव हेमराज गांधी, काका शेळके, संचालक मंडळ आणि सभासद उपस्थित होते.




दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंस ऑफ इंडियाच्या बोर्ड ऑफ स्टडीज अंतर्गत अहिल्यानगर सीए विद्यार्थी शाखेने दोन दिवसीय राज्यस्तरीय विद्यार्थी परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेला ३०० पेक्षा अधिक राज्यातील सीए विद्यार्थ्यांनी उपस्थिती नोंदवली.

## सीए विद्यार्थी शाखेची राज्यस्तरीय विद्यार्थी परिषद उत्साहात

नगर – दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंस ऑफ इंडियाच्या बोर्ड ऑफ स्टडीज अंतर्गत अहिल्यानगर सीए विद्यार्थी शाखेने दोन दिवसीय राज्यस्तरीय विद्यार्थी परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेला ३०० पेक्षा अधिक राज्यातील सीए विद्यार्थ्यांनी उपस्थिती नोंदवली. सदर परिषदेत आयकर कायदा (इन्कम टॅक्स), जीएसटी, भारतीय अर्थव्यवस्था, ऑडिट अशा विषयांवर नगर, पुणे, मुंबई, दिल्ली येथून आलेल्या वक्त्यांची व्याख्याने झाली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांकरीता प्रेरणादायी सत्रे देखील आयोजित केली गेली होती. राज्यातून आलेल्या १२ विद्यार्थ्यांनी त्यांचे विविध विषयांवरील प्रबंध सादर केले.

या परिषदेचे उद्घाटन सीए दुर्गेश काबरा व सीए (डॉ.) गिरीश आहुजा यांच्या हस्ते झाले यावेळी सीए दुर्गेश काबरा, सीए (डॉ.) गिरीश आहुजा व सीए पियुष छाजेड यांनी विद्यार्थी परिषदेचे महत्व सांगत त्यामध्ये सहभागाने होणारे फायदे तसेच आयकर याविषयी मार्गदर्शन केले.

अहमदनगर सीए विद्यार्थी शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी परिषदेचे प्रास्ताविक केले व अहमदनगर शाखेने वर्षभर राबवलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

अहमदनगर शाखेचे अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

सीए शाखेचे खजिनदार सीए महेश भळगट यांनी आभार मानले.

सीए विजेंद्र जैन यांनी विद्यार्थ्यांना शेअर मार्केट मधील जोखीम व त्यासंदर्भात घ्यावयाची दक्षता याबाबत माहिती दिली.

सीए पीयूष चांडक यांनी एआय आणि अकाऊंटंट, सीए पीयूष छाजेड यांनी प्रत्यक्ष कर डिकोडिंग, सीए कार्तिक जिंदाल यांचे भारतातील आर्थिक अहवालाचा विकसित होत असलेला चेहरा, सीए आकाश कंडोई, सीए हृद्येश पंखानिया व सीए ऋषभ जैन यांचे प्रेरणादायी व्याख्यान सर्वांसाठी उपयुक्त ठरले.

संजय मालपाणी, भूषण मालू व श्रेणिक भणगे यांच्या आध्यात्मिक व्याख्यानाने परिषदेची सांगता झाली.

यावेळेस विद्यार्थ्यांसाठी यूथ फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले होते व विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावली.

सदर परिषद आयोजित करण्यात सीसीएम कॉन्फरन्स डायरेक्टर सीए दुर्गेश काबरा, अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद पुराणिक, अहिल्यानगर सीए विद्यार्थी शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया, सचिव सीए महेश तिवारी, खजिनदार सीए महेश भळगट, सदस्य सीए सुनंदा रच्चा, विकासा समिती सदस्य ब्राह्मी शिंगवी, अबुजर शेख, तेजस कसवा, वेद सुवर्णपाठकी, राशि कर्नावट, अक्षय कटारिया, ऋषिकेष डफळ तसेच वॉलेंटियर्स आदींनी परिश्रम घेतले.

# अहिल्यानगर शहरात स्त्रीमुक्तीचा गजर

## स्त्रियांच्या चळवळीमुळे स्त्रीजीवनात मोठे परिवर्तन झाले : मनिषा गुप्ते

नगर – महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषद आणि सी एस आर डी संस्थेच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या घोषणेला पन्नास वर्षे झाल्यानिमित्त आयोजित महिला परिषदेच्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या मनिषा गुप्ते यांनी गेल्या पन्नास वर्षातील स्त्रियांच्या चळवळीचा आढावा घेतला. स्त्रियांच्या चळवळीमुळे स्त्रीजीवनात मोठे परिवर्तन झाले आहे. हा वारसा आपल्याला पुढे न्यायचा आहे. त्यासाठी स्त्री पुरुष समतेच्या मूल्यावर विश्वास ठेवून संविधानाच्या आधारावर काम करायला हवे, असे त्यांनी भाषणात सांगितले.



महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषद आणि सी एस आर डी संस्थेच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या घोषणेला पन्नास वर्षे झाल्या निमित्त आयोजित महिला परिषदेच्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या मनिषा गुप्ते यांनी गेल्या पन्नास वर्षातील स्त्रियांच्या चळवळीचा आढावा घेतला.

परिषदेचे उद्घाटन सीएसआरडी प्राचार्य सुरेश पठारे यांनी केले. स्त्रियांच्या चळवळीने महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुलेंचा वारसा पुढे नेत काम केले आहे असे सांगून त्यांनी परिषदेला शुभेच्छा दिल्या.

अहिल्यानगर येथील पोलिस भरोसा विभागाच्या प्रमुख प्रियंका आठरे यांनी कामाविषयी माहिती दिली.

सर्व धर्मीय समाजाच्या एकात्मतेच्या वातावरणातच स्त्रियांच्या चळवळीला सामर्थ्य मिळते. भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यावर विश्वास ठेवत स्त्रियांमधील भगिनीभाव वाढवणे हे चळवळीचे कार्य आहेअसे परिषदेच्या अध्यक्ष ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या साथी ॲड. निशा शिवूरकर यांनी आपल्या भाषणात सांगितले.

परिषदेच्या प्रास्ताविकात नीलिमा जाधव बंडेलू यांनी अहमदनगर जिल्ह्यातील चळवळींच्या वारसा आपण पुढे न्यायला हवा, असे आवाहन केले.

प्रमुख पाहुण्या कॉ. लता भिसे यांनी महाराष्ट स्त्रीमुक्ती परिषदेच्या वाटचालीचा, विविध मोहिमांविषयी भाषणात सांगितले. एका हातात तिरंगा आणि दुसऱ्या हातात संविधान घेऊन स्त्री चळवळीला कार्य करायचे आहे. असे विचार त्यांनी व्यक्त केले.

डॉ.रमेश अवस्थी आणि कॉ. स्मिता पानसरे यांनी हिंसेच्या विविध पैलूंवर उपस्थित प्रतिनिधींमध्ये चर्चा घडवून आणली. सर्व प्रकारच्या हिंसेविरोधात एकत्र काम करण्याची गरज या चर्चेत सहभागींनी व्यक्त केली.

ॲड.निर्मला चौधरी यांनी अहमदनगर जिल्ह्यातील बेपत्ता झालेल्या मुलींच्या प्रश्नाची मांडणी केली. शाहीर प्रवीण सोनवणे आणि साथींनी चळवळींची विविध गाणी सादर केली. संध्या मेढे यांनी आभार मानले. परिषदेच्या यशस्वीतेसाठी संध्या मेढे, ॲड. निर्मला चौधरी, विजया जाधव, सॅम्युअल वाघमारे, भैरवनाथ वाकळे, ॲड. मीनल देशमुख, सत्यभामा थिटमे, सुरेखा आडम, बेबीताई जाधव, शांताराम गोसावी, मंगला भावसार, सरोज आल्हाट, स्मिता पानसरे इत्यादींनी प्रयत्न केले.

# आदर्श नगरसेवक कसा असावा? नगरकरांसाठी खुल्या निबंध स्पर्धा

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुका लवकरच होणार आहेत. नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यापासून नगरकरांना मोठ्या महानगराप्रमाणे विकासाची प्रतिक्षा आहे. यात प्रत्येक प्रभागातील नगरसेवक महत्वाची भूमिका बजावतात. त्यांच्याकडून प्रभागाच्या, शहराच्या सर्वांगीण विकासाची अपेक्षा असते. जवळपास वीस वर्षांपासून नगरकर प्रत्येक प्रभागातून नगरसेवक निवडून देत आहेत. त्या माध्यमातून अनेक विकासकामे नक्कीच मार्गी लागली आहेत. आता येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीतून विजयी होणारा नगरसेवकाचे आदर्श काम कसे केले पाहिजे, नागरिकांच्या अपेक्षांची पूर्ती कशी केली पाहिजे तसेच त्यांचे शहर विकासाचे व्हिजन कसे असावे या विषयावर नगरकरांसाठी खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती दुर्गाप्रसाद राठोड व संतोष कासवा यांनी दिली. स्पर्धेतील विजेत्यांना रामप्रसाद चिवडावाला यांच्यावतीने आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत.

या निबंध स्पर्धेत सर्व वयोगटातील महिला, पुरुष नागरिक, युवक, युवती सहभागी होवू शकतील. प्रथम पाच विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत.

निबंध सुमारे १ हजार शब्दांचा सुवाच्च हस्ताक्षरात लिहिलेला असावा. तसेच निबंधात कोणतेही राजकीय भाष्य न करता केवळ प्रभागाचा व शहराचा एकूणच विकास कसा साध्य करावा व नगरसेवकाकडून काय अपेक्षित आहे या मुद्दयांवर भर देण्यात यावा. प्रभागातील सोयी सुविधा, नियमित कचरा संकलन, स्वच्छता, वृक्ष लागवड, पथदिवे, ओपन स्पेसचा विकास, लहान मुलांसाठी उद्याने, ज्येष्ठांसाठी विरंगुळा केंद्र, प्रभाग सुशोभिकरण अशा महानगरपालिकेशी संबंधित कामे व ती पूर्ण होण्यासाठी नगरसेवकांनी काय केले पाहिजे याबाबत निबंधात सविस्तर विवेचन करणे अपेक्षित आहे.

स्पर्धकांनी आपले निबंध ३० ऑक्टोबर पर्यंत रामप्रसाद चिवडा, पटेल मेडिकल शेजारी, चितळे रोड, अहिल्यानगर येथे जमा करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे


विजयी बास्केटबॉल नालंदा स्कूलच्या संघात समवेत विद्यालयाचे गौतम बहादुर्गे क्रीडाशिक्षक शादाब मोमीन. (छाया – समीर मन्यार)

# बास्केटबॉल स्पर्धेत नालंदा स्कूलच्या मुलींचा संघ विजयी

## दोन विद्यार्थिनींची विभागीयस्तरावर निवड

नगर – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आठरे पाटील पब्लिक स्कूल येथे नुकत्याच घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत सोलापूर रोडवरील नालंदा स्कूलच्या मुलीच्या संघांनी उल्लेखनीय कामगिरी करत वय वर्ष सतरा (१७) गटात घेण्यात आलेल्या बास्केटबॉल स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकावर बाजी मारत विद्यालयाचा नावलौकिक केला आहे.

यामध्ये विभाग विभागीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी दिशा गांधी व मृणाल पालवे या दोन विद्यार्थिनींची निवड करण्यात आली आहे. विजयी संघाचे विद्यालयाच्या वतीने विद्यालयाचे गौतम बहादुर्गे व क्रीडाशिक्षक शादाब मोमीन यांनी कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.

# श्री बेलेश्वर महादेव मंदिरात चांदीचा मुकुट अर्पण सोहळा दिमाखात पार

## हर हर महादेव... च्या घोषात हजारो भाविकांची उपस्थिती

नगर – हर हर महादेव... जय शिव शंकर... बम बम भोले... अशा गजराने १३ ऑक्टोबर रात्री श्री बेलेश्वर महादेव मंदिर परिसर दुमदुमून गेला. ढोल, झांज, डमरू यांच्या गजरात, फुलांच्या सुगंधात आणि दिव्य प्रकाशात बेलेश्वर महादेव मंदिरातील भगवान शंकराच्या पिंडसाठी चांदीचा मुकुट अर्पण सोहळा धार्मिक वातावरणात रंगला होता. या देवस्थानात पहिल्यांदाच चांदीचा मुकुट अर्पण करण्यात आला. या प्रसंगी श्री बेलेश्वर महादेवाच्या पिंडीवर चांदीचा तेजस्वी मुकुट सजविण्यात आला होता, त्या धार्मिक दृश्याने उपस्थित हजारो भाविक मंत्रमुग्ध झाले. सोमवारी सायंकाळी स्टेट बँक चौकातून चांदीच्या मुकुटाची मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक पद्धतीने सजवलेल्या बैलगाडीत मुकुटाचे दर्शन ठेवण्यात आले. भक्तीगीतांच्या तालावर नाचत, भोलेनाथ की जय! म्हणत भाविकांनी उत्साहाने मिरवणुकीत सहभाग घेतला. यामध्ये महिला वर्ग देखील उपस्थित होते.


श्री बेलेश्वर महादेव मंदिरात चांदीचा मुकुट अर्पण सोहळा दिमाखात पार पडला यात सहभागी झालेले भाविक.

या सोहळ्याचे आयोजन लक्ष्मण (आबा) कचरे, संतोष कानडे, गणेश लालबागे, संदीप गुजर, तसेच श्री बेलेश्वर आरती ग्रुप व आदिशक्ती सार्वजनिक मित्र मंडळ यांनी केले होते. त्यांच्या अथक परिश्रमामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता.

या सोहळ्याला आमदार संग्राम जगताप यांनी भेट देत भाविकांना शुभेच्छा दिल्या. रात्री महाआरतीच्या वेळी संपूर्ण मंदिर परिसर मंत्रोच्चारांनी दुमदुमला. दीपांच्या उजेडात भगवान शंकराची आरती होताच भाविकांनी जयघोष केला. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी चांदीचा मुकुट बनवणारे कारागीर बजरंग काशिनाथ गुरव तसेच सोहळ्याचे प्रमुख संयोजक यांचा आमदार जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या धार्मिक सोहळ्याला शहरातील आजी–माजी नगरसेवक, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि भक्तगण उपस्थित होते. सोहळा यशस्वी होण्यासाठी अतुल जाधव व सर्व मित्रपरिवार, नातेवाईक आणि आप्तेष्टांनी परिश्रम घेतले.


न्यू आर्ट्स बीबीए व बीबीए (आय. बी) विभाग आयोजित केलेल्या औद्योगिक क्षेत्र भेटी दरम्यान जीकेएन सिंटर मेटल लिमिटेड या कंपनीतील एच. आर. मॅनेजर बाळासाहेब खिलारी, बीबीए व बीबीए (आय बी) विभागप्रमुख प्रा. डॉ. मंगेश वाघमारे, प्रा. शामल जाधव, डॉ.रूपाली घोरपडे व सहभागी विद्यार्थी.

# न्यू आर्ट्स कॉलेज बीबीए व बीबीए (आय.बी.) विभागाची औद्योगिक क्षेत्रभेट

## विद्यार्थांनी घेतला प्रात्यक्षिक अनुभव

नगर – न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथील बीबीए व बीबीए (आय.बी.) विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी औद्योगिक क्षेत्रभेटींचे आयोजन केले जाते. उद्योगांमध्ये प्रत्यक्ष कार्यप्रणाली, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन यांचा प्रात्यक्षिक अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा या उद्देशाने औद्योगिक क्षेत्र भेटीचे आयोजन केले जाते. यावर्षीही बी बी ए आणि बी बी ए (आय बी) विभागातर्फे अहिल्यानगर येथील उद्योगांमध्ये औद्योगिक क्षेत्रांना भेट देण्यात आली. सदर भेटीमध्ये विद्यार्थ्यांनी जी.के. एन. सिण्टर मेटल्स लिमिटेड, प्रथमेश इंडस्ट्रीज, कामधेनू इंडस्ट्रीज आणि सन फार्मा इंडस्ट्रीज (अहिल्यानगर) या कंपन्यांना भेट दिली.

जी.के.एन. सिण्टर मेटल्स लिमिटेड येथे विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रात सध्या वापरल्या जाणाऱ्या ए.आय.,एम.एल., रोबोटिक्ससह विविध अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पाहता आले. कंपनीतील व्यवस्थापकांनी उत्पादन पद्धती, उत्पादन क्षमता व आधुनिक प्रक्रियांविषयी मार्गदर्शन केले.

प्रथमेश इंडस्ट्रीजमधील एच.आर. मॅनेजर विघ्नेश कुलकर्णी यांनी यंत्रसामग्री, आधुनिक तंत्रज्ञान आणि मानव संसाधन व्यवस्थापन याबद्दल विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

कामधेनू इंडस्ट्रीजचे सुहास फुंदे यांनी कच्च्या मालावर प्रक्रिया, गुणवत्ता, साठवणूक व वितरण पद्धतीचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सनफार्मा इंडस्ट्रीजमध्येश्रीनिवास यांनी विद्यार्थ्यांना औषध उद्योगांची प्रत्यक्ष कार्यप्रणाली, जीएमपी व गुणवत्ता नियंत्रण पद्धती यांची ओळख करून दिली तसेच नवनवीन औषधनिर्मितीसाठी चालणाऱ्या संशोधन प्रक्रियेची सविस्तर माहिती दिली.

या औद्योगिक क्षेत्रभेटींमुळे विद्यार्थ्यांना उद्योगांमध्ये वापरल्या जाणाऱ्या नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळाली तसेच रोजगाराच्या विविध संधींबाबत जागरूकता निर्माण झाली. विद्यार्थांनी बहुराष्ट्रीय असलेली कंपनी होगनास इंडिया प्रायव्हेट ली.या कंपनीला भेट दिली. सदर इंडस्ट्रीतील प्लांट हेड शरद मगर यांनी विद्यार्थांना इंडस्ट्री बाबत तसेच रोजगारासाठी विद्यार्थानी कुठली कौशल्य विकसित करावी याबाबत मार्गदर्शन केले.

या भेटीचे नियोजन बीबीए व बीबीए (आय.बी.) विभाग प्रमुख प्रा. डॉ. मंगेश वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी या भेटींमुळे विद्यार्थ्यांना रोजगारक्षमतेच्या दृष्टीने मोठा फायदा होईल असे मत व्यक्त केले. सदर भेटी यशस्वी करण्यासाठी प्रा. शामल जाधव व डॉ. रूपाली घोरपडे यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनीही या क्षेत्रभेटीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी कवी – लेखक इंद्रजीत भालेराव



नगर – महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या अंतर्गत साहित्य आणि संस्कृती मंडळांच्या समन्वयाने अहिल्यानगर शहरात ८, ९ नोव्हेंबर रोजी सुखकर्ता लॉन व मंगल कार्यालय (नेप्ती बायपास चौकाजवळ, कल्याण रोड, अहिल्यानगर) येथे दोन दिवसीय साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी कवी–लेखक इंद्रजीत भालेराव यांची निवड करण्यात आल्याची माहिती संयोजक सचिन मोहन चोभे यांनी दिली.


याबद्दल अधिक माहिती देताना चोभे यांनी सांगितले की, स्वातंत्र्यसैनिक सेनापती बापट यांच्या विचारांना उजाळा देण्याच्या उद्देशाने यंदाच्या साहित्य संमेलनास त्यांचे नाव दिलेले आहे. चालू वर्षी अवघ्या महाराष्ट्रात ओला दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी–कष्टकरी यांच्यावर संकट ओढवले आहे. अशावेळी साहित्याच्या माध्यमातून शेतकरी, कष्टकरी व वंचित घटकांच्या परिस्थितीवर चर्चा होण्याच्या उद्देशाने इंद्रजीत भालेराव यांची निवड करण्यात आली आहे. आत्मनिर्धार फाउंडेशन (निंबळक, ता. नगर) यांना यंदाच्या जिल्हा साहित्य संमेलनाचे नियोजन करण्याचा मान मिळाला आहे. जिल्ह्यासह शेजारील पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, बीड, सोलापूर आदि जिल्ह्यातील साहित्यिक, कवी आणि साहित्यरसिक या संमेलनात सहभागी होत आहेत.

आयोजक संस्था आत्मनिर्धार फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी यांनी याबद्दल माहिती देताना सांगितले की, अशा पद्धतीने जिल्हास्तरावर साहित्य संमेलनाची संधी मिळाल्याने एकूणच संपूर्ण जिल्ह्यातील साहित्यिक–कवी यांनी सर्वोतोपरि सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच शैक्षणिक संस्था, विविध सरकारी कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद आणि महानगरपालिका यांचीही मदत घेतली जात आहे. अनेक शाळांतील शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापकांनाही यामध्ये निमंत्रित केले आहे. महिला साहित्यिकांनाही यामध्ये विशेष संधी देण्यासाठी आमची संयोजन समिती प्रयत्न करत आहे.

याबद्दल माहिती देताना संयोजन समितीचे समन्वयक लेखक रामदास कोतकर यांनी सांगितले की, जिल्ह्यातील सर्वच साहित्यिकांच्या संस्थांशी आम्ही संपर्क करत आहोत. नवसाहित्यिक आणि जुने साहित्यिक एकत्र काम करत असल्याने हे संमेलन निश्चित यशस्वी होईल. प्रत्येक सत्र साहित्यरसिकांसाठी महत्वाचे असेच असेल. नेटके आणि काटेकोर नियोजन करून अधिकाधिक साहित्यिक आणि रसिकांना सहभागी करून घेण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे नियोजन केले जात आहे. तसेच यापुढेही कोणालाही संमेलनास आर्थिक किंवा सामाजिक भावनेने मदत करण्याची इच्छा असल्यास त्यांनीही यामध्ये सहभागी व्हावे. सर्वांच्या सहकार्यानेच हा कार्यक्रम यशस्वी होणार आहे.

# विचार भारतीच्या 'मातृशक्तीचा जागर उपक्रमाचा' १७ ऑक्टोबर रोजी होणार समारोपाचा कार्यक्रम

## खा.मेघा कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती




नगर – विचार भारती संस्थेच्या वतीने नवरात्र उत्सवात शहरात विविध भागांमध्ये 'मातृशक्तीचा जागर करूया आदर्श परिवार घडवूया' या जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजनातून मातृशक्तीचा जागर करण्यात आला होता. या कार्यक्रमाचा समारोप १७ ऑक्टोबर रोजी दुपारी ३ ते ६ या वेळेत माऊली सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमाने होणार आहे. राज्यसभेच्या खासदार मेघा कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमास प्रमुख वक्त्या दरेवाडी येथील नर्मदेश्वर देवस्थानच्या हभप हिराताई मोकाटे महाराज उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात शहरातील सर्व भजनी मंडळ, बचत गट आणि नवरात्र उत्सव मंडळांचा विशेष सन्मान विचार भारताच्या वतीने करण्यात येणार आहे, अशी माहिती उपक्रम प्रमुख पुष्कर कुलकर्णी यांनी दिली.

या कार्यक्रमात दिवाळीचा पहिला दिवस वसुबारस निमित्त गो पूजन व दीपोत्सव साजरा करण्यात येणार आहे.

नागरिकांनी, भजनी मंडळांनी, बचत गट सदस्यांनी व सार्वजनिक नवरात्र उत्सव साजरा करणाऱ्या मंडळांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मंदाकिनी गायकवाड, भावना लांडगे, माया वाकळे, दिपाली डीडवाणीया, पुष्पा बोरुडे व रूपाली वारे आदींनी केले आहे.

# केरळच्या राज्यपालांना केरळच्या अय्यप्पा मंदिरासंबंधी दिले निवेदन

## शबरीमाला अय्यप्पा सेवा समागम

नगर – केरळचे राज्यपाल महामहीम राजेंद्र आर्लेकर यांच्या हस्ते पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेच्या उद्घाटनाच्या निमित्ताने भेट देण्यात आली. श्री.आर्लेकर यांनी केरळचे राज्यपाल म्हणून शपथ घेतल्यानंतर प्रथमच अहिल्यानगर येथे आगमन केले होते. याप्रसंगी त्यांच्यासोबत विशेष बैठक आणि भोजनाचे आयोजन अहिल्यानगर अय्यप्पा मंदिराचे संस्थापक अध्यक्ष केके शेट्टी यांच्या निवासस्थानी करण्यात आले होते. हे अहिल्यानगरसाठी सन्मानास्पद ठरले. सबरीमला अय्यप्पा सेवा समाजम्चे (SASS) भारताचे राष्ट्रीय सचिव अजीत के.नायर यांनी पश्चिम महाराष्ट्र प्रांतातील अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने केरळमधील अय्यप्पा स्वामींच्या मूळ मंदिरासंबंधी भक्तांच्या काही चिंतेची माहिती राज्यपाल यांना दिली. केरळ येथील सबरीमला पर्वतावरील त्या पवित्र मंदिरात सुमारे ४० किलो सोने आणि १०० किलो चांदी मंदिराच्या संग्रहातून व सजावटीतून गायब झाल्याची बाब समोर आली असल्याचे त्यांनी सांगितले.


केरळचे राज्यपाल महामहीम राजेंद्र आर्लेकर यांच्या हस्ते पंडित दीनदयाळ व्याख्यानमालेच्या उद्घाटनाच्या निमित्ताने भेट देण्यात आली याप्रसंगी त्यांना केरळच्या अय्यप्पा मंदिरासंबंधी दिले निवेदन देताना अजीत के.नायर आदी.

या संदर्भात, सबरीमला अय्यप्पा सेवा समाजम् (SASS) चे राष्ट्रीय सचिव अजीत के. नायर यांनी अहिल्यानगर येथील श्री अय्यप्पा मंदिराचे संस्थापक अध्यक्ष तसेच श्री अय्यप्पा सेवा समितीचे विद्यमान अध्यक्ष केके शेट्टी यांच्या सहकार्याने राज्यपालांना निवेदन सादर केले. या निवेदनाद्वारे त्यांनी संबंधित घटनेची गंभीर दखल घेऊन, त्या प्रकरणातील घडामोडींवर लवकरात लवकर CBI चौकशी करण्याचे आदेश द्यावेत. अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनामध्ये अय्यप्पा मंदिराशी संबंधित विविध बाबींचा सविस्तर उल्लेख करण्यात आला होता – विशेषतः मंडलम– मकर विलक्कू तसेच नियमित मासिक पूजेच्या कालावधीत भक्तांच्या सुरक्षिततेबाबत आणि त्यांच्या गरजांबाबतची मागणीही करण्यात आली आहे.

मुख्यतः केरळमधील हिंदू मंदिरांच्या चल आणि अचल संपत्तीवर वाढत असलेल्या गंभीर धोक्याबाबत, तसेच केरळमधील राजकीय हस्तक्षेप आणि महाराष्ट्रातील काही दक्षिण भारतीय मंदिरांमधील घडामोडींविषयी विशेषत: लक्ष वेधण्यात आले.

पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान आयोजित केलेल्या व्याख्यानमालेमध्ये उद्घाटन करण्यासाठी राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांना बोलवण्यात आले होते त्यामुळे आम्हाला सदरचे निवेदन त्यांना प्रत्यक्षरीत्या देता आले. त्याबद्दल शबरीमाला अय्यप्पा सेवा समागम, अहिल्यानगर हे पंडित दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन वसंत लोढा, धनंजय तागडे अध्यक्ष दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान, बाळासाहेब भुजबळ महासचिव परिवार प्रतिष्ठान, अशोक कानडे विश्वस्त विशाल गणपती ट्रस्ट यांचे बद्दल कृतज्ञता व्यक्त करीत आहे.



# तो इंजिन ऑईल पिऊन जगतो

जगात अनेक तऱ्हेची माणसं असतात. काही साधी-भोळी, काही खट्याळ तर काही अतरंगी. सोशल मीडियावरही अशा काही माणसांचे किस्से, फोटो, व्हिडीओ फिरत असतात. अलिकडेच कर्नाटकातून एक विचित्र प्रकरण समोर आले आहे. तिथे एका माणसाने आपल्या खाण्याच्या सवयींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. असा दावा केला जात आहे की, हा माणूस पोळी-भाजी, भात-आमटी असे सामान्य अन्न खात नाही तर तो इंजिन ऑइलवरच जगतो. 'इंजिन ऑइलवर जगणारा माणूस' अशीच त्याची ख्याती आहे. इंस्टाग्रामवर एक रील समोर आल्यावर त्या माणसाची गेल्या अनेक दशकांपासूनची ही जुनी सवय व्हायरल झाली आहे. विशेष म्हणजे, गेल्या तीस वर्षांपासून त्याच्या आहारात इंजिन ऑइलचा समावेश आहे. सोशल मीडिया पोस्टनुसार, कर्नाटकातील शिवमोगा जिल्ह्यातील रहिवासी असणारा हा माणूस आजूबाजूच्या परिसरात 'ऑइल कुमार' म्हणून ओळखला जातो. तो दररोज अंदाजे सात ते आठ लिटर इंजिन ऑइल पित असल्याचे सांगितले जाते. एवढंच नव्हे तर तो नियमितपणे चहाही पितो.

या पोस्टनुसार, अनेक दशके इंजिन ऑइल प्यायल्यानंतरही ऑइल कुमार यांना कधीही रुग्णालयात दाखल करावे लागले नाही किंवा त्यांना कधीही कोणत्याही आरोग्य समस्यांचा सामना करावा लागलेला नाही. असे जीवन भगवान अय्यप्पांच्या आशीर्वादामुळे मिळाल्याचा ऑइल कुमारांना विश्वास आहे. दैवी मदतीखेरीज अशा असामान्य आहारावर कोणीही जगणे शक्य नसल्याचा दावा ते करतात.

# कॅलिडोस्कोप

## व्हिसाशिवाय फिरा ५८ देश

भारतीय पासपोर्ट असेल तर तुम्ही ५८ देशांमध्ये व्हिसाशिवाय प्रवास करु शकता. या देशांची यादी कमी लोकांना माहिती आहे. फक्त थायलंड आणि मलेशियासारख्या देशांमध्ये व्हिसामुक्त किंवा व्हिसा-ऑन-अरायव्हलसह भेट दिली जाऊ शकते, असे काहींना वाटते. मात्र हेन्ले पासपोर्ट इंडेक्स २०२५ नुसार, भारतीय नागरिक व्हिसाशिवाय ५८ देशांमध्ये प्रवास करू शकतात.

या यादीतील लोकप्रिय ठिकाणांमध्ये इंडोनेशिया, मॉरिशस, केनिया, मालदीव आणि थायलंड या देशांचा समावेश आहे. हे देश सुंदर लँडस्केप आणि संस्कृतीसाठी ओळखले जातात. शिवाय लाओस, मादागास्कर, फिजी आणि झिम्बाब्वे यासारखे देश अनोखा अनुभव देतात. इंडोनेशिया आणि थायलंड उत्कृष्ट सफारी आणि निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे. फिजी आणि पलाऊ बेटे नैसर्गिक समुद्रकिनारे आणि विविध सागरी जीवनासाठी ओळखली जातात.

भूतान आणि नेपाळ हे अद्वितीय संस्कृती आणि परंपरा असणारे तसेच सहज पोहोचण्यायोग्य देश आहेत. ही वेगवेगळ्या खंडांवर स्थित देश आणि बेटांची यादी आहे. यापैकी काही लहान बेट देश आहेत तर काही आफ्रिका आणि आशियामध्ये आहेत. अंगोला, बुरुंडी, केनिया, मोझांबिक, नामिबिया, इथिओपिया, सोमालिया, टांझानिया, झिम्बाब्वे, सेशेल्स, मॉरिशस, मादागास्कर, सेनेगल, सिएरा लिओन, गिनी-बिसाऊ, जिबूती, केप वर्दे हे आफ्रिकेतील देश असून तिथे व्हिसाशिवाय जाता येते. आशियातील भूतान, नेपाळ, श्रीलंका, म्यानमार, थायलंड, मलेशिया, मालदीव, इंडोनेशिया, इराण, कझाकस्तान, कंबोडिया, लाओस, मकाऊ (चीनचा भाग), कतार, जॉर्डन,




मंगोलिया, तिमोर-लेस्टे या देशांतही व्हिसाशिवाय जाता येते. कॅरिबियन समुद्रातील बार्बाडोस, डोमिनिका, ग्रेनाडा, हैती, जमैका, सेंट किट्स आणि नेव्हिस, सेंट लुसिया, सेंट व्हिन्सेंट आणि ग्रेनेडाइन्स, त्रिनिदाद आणि टोबॅगो, मोंटसेराट (यूकेचा भाग), ब्रिटिश व्हर्जिन बेटावरही व्हिसाशिवाय जाता येते. पॅसिफिक महासागरातील (ओशनिया) लहान बेट देश म्हणजे फिजी, सामोआ, वानुआतु, तुवालू, किरिबाटी, मार्शल बेटे, मायक्रोनेशिया, पलाऊ, कुक बेटे, नियू, कोमोरोस बेटे तसेच भारताभोवती अनेक देश भारतीय नागरिकांना व्हिसा-मुक्त प्रवेश किंवा सोप्या प्रवेश प्रक्रिया देतात. त्यामुळे प्रवास करणे सोपे होते. नेपाळची भारताशी खुली सीमा आहे. त्यामुळे व्हिसा किंवा इतर कोणत्याही गुंतागुंतीच्या प्रक्रियेशिवाय थेट भेट देता येते. भूतानला व्हिसाची आवश्यकता नाही. फक्त प्रवेश परवाना आवश्यक आहे. तो सहज मिळू शकतो. श्रीलंका भारतीय नागरिकांना आगमनानंतर व्हिसा देते. काही देशात प्रवास करण्यापूर्वी 'इलेक्ट्रॉनिक ट्रॅव्हल ऑथोरायझेशन' (ईटीए) मिळवण्याची आवश्यकता असू शकते. आगमनानंतर व्हिसा आवश्यक असू शकतो. त्यासाठी पासपोर्ट परतीच्या तारखेपासून किमान सहा महिने वैध असणे आवश्यक आहे. व्हिसाशिवाय एखाद्या देशात प्रवास करत असाल, तर तेथे जास्तीत जास्त किती दिवस राहण्याची परवानगी आहे, हे मात्र तपासले पाहिजे.

# मित्र ही मिळतात भाड्याने

राज्याच्या काही भागांमध्ये एक नवीन प्रकारचे सोशल प्लॅटफॉर्म वेगाने लोकप्रिय होत आहे. 'फ्रेंड्स ऑन रेंट' असे त्याचे नाव असून यावर मैत्री निर्माण करण्यासाठी मित्र भाड्याने मिळत आहेत. हे मित्र ५० रुपये तास हा दराने काम करतात. ते तुमच्याबरोबर फिरायला जाण्यासाठी, कॉफी पिण्यासाठी, चित्रपट पाहण्यासाठी किंवा सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी तयार असतात. अशा प्रकारच्या मैत्रीच्या प्लॅटफॉर्ममुळे देशातील चिंता वाढली आहे.

'फ्रेंड्स अड्डा', 'फ्रेंड', 'पालमॅच' यासारखे ॲप्स फेसबुक आणि टेलिग्रामवर खूपच प्रसिद्ध आहेत. युजर्स या ॲप्सवरील प्रोफाइल्स ब्राउझ करतात. वय, भाषा किंवा आवडींनुसार मित्र फिल्टर करू शकतात आणि उपलब्धतेनुसार कोणालाही बुक करू शकतात. 'फ्रेंड्स ऑन रेंट' या ॲपचा ट्रेंड सध्या केरळमध्ये मोठ्या



प्रमाणावर पाहायला मिळत आहे.

या प्लॅटफॉर्म्सद्वारे फक्त मित्र पुरवले जातात. म्हणजेच या सेवा रोमान्स आणि सेक्स यांच्या पूर्णपणे विरोधात आहेत. या ॲपने स्पष्ट केले आहे, की कोणतेही याद्वारे सेक्स किंवा शारीरिक स्पर्श होणार नाही. कोणतेही वैयक्तिक प्रश्न विचारले जाणार नाहीत आणि कोणतीही खासगी जागा असणार नाही. ॲपवर बुक केल्यानंतर निवडलेला मित्र येतो, बुक केलेला वेळ घालवतो आणि निघून जातो.

केरळ विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाच्या प्रमुख बुशरा बेगम यांनी सांगितले, की, हा ट्रेंड राज्यात वाढत्या शहरी एकटेपणाचे दर्शन घडवणारा आहे. सध्या तरुण घरापासून दूर जात आहेत. एकल कुटुंबांचा दर्जा खालावत आहे. कोणाकडेही वेळ उरलेला नाही. कामाच्या ओझ्याखाली मैत्री कमी होत आहे. अशा परिस्थितीत पैसे देऊन मैत्री करणे सोपे वाटू शकते; पण ही ती मैत्री नाही जी पैशांशिवाय फुलते. केरळमधील एका युजरने ऑनलाइन पोस्ट करून यातील धोकेही दाखवून दिले आहेत. त्यावर गांभीर्याने विचार व्हायला हवा.




# हुंडा न घेणारं आदर्श कुटुंब

हुंड्याची कुप्रथा आजही अस्तित्वात आहे. लालसेपायी अधिकाधिक हुंडा घेतला जातो. घरच्या सुनेला त्रास दिला जातो. टोमणे मारले जातात. मात्र काही लोक या प्रथेला फक्त विरोधच करत नाहीत तर आपल्या कृतीतून समाजासमोर आदर्श निर्माण करतात. इंदूरमधलं फतेहचंदानी कुटुंब अशाच काही मोजक्या कुटुंबांपैकी एक. गेल्या ४५ वर्षांमध्ये या कुटुंबात सहा विवाह सोहळे संपन्न झाले. मात्र या कुटुंबाने सुनांकडून कधीही हुंडा घेतला नाही. लग्नाला येणाऱ्या पाहुण्यांकडून भेटवस्तूही स्वीकारल्या नाहीत. फतेहचंदानी कुटुंबात २१ सदस्य राहतात. एकत्रच स्वयंपाक करतात, एकत्रच जेवतात. या कुटुंबात घरी येणाऱ्या सुनेला लक्ष्मीचं रुप मानलं जातं. त्यामुळे मुलीच्या घरच्यांकडून हुंडा घेतला जात नाही. साखरपुड्यात मुलीकडून पाच किलो खडीसाखर आणि अकरा नारळ घेतले जातात. हाच काय तो त्यांचा हुंडा. या शिवाय दुसरी कोणतीही वस्तू स्वीकारली जात नाही. फतेहचंदानी कुटुंबियांना आदर्श मानून त्यांच्या समाजातल्या अनेकांनी हुंडा न घेण्याचा निर्णय घेतला आहे. ही खूप मोठी गोष्ट असल्याचं या कुटुंबाला वाटतं. समाजात बदल घडणं आवश्यक असल्याचं त्यांचं म्हणणं आहेय फतेहचंदानी कुटुंबाकडूनच सुनेला दागिने घातले जातात. लग्नाच्या पत्रिकेत भेटवस्तू न आणण्याची विनंती केली जाते. आजच्या काळात सुखाने नांदणारं एकत्र कुटुंब पहायला मिळत नाही. पण फतेहचंदानी कुटुंबाने एकत्र कुटुंबाची परंपरा जोपासली आहे. सुनेला लक्ष्मीचं रुप मानून योग्य तो मानसन्मान देणाऱ्या या कुटुंबाकडून समाजाने धडे घेणं गरजेचं आहे.

# बाळांची नावे ठेवण्यातून कमावते कोट्यवधी!

बाळाचं आगमन झाल्यानंतर कुटुंबात आनंदाचं आणि उत्साहाचं वातावरण पसरतं. बाळ जन्माला यायच्या आधी चर्चा असते ती म्हणजे मुलगा असेल तर काय नाव ठेवायचं आणि मुलगी असेल तर काय नाव ठेवायचं? भारतात बाळाचं नाव ठेवणं ही एक पारंपरिक बाब आहे. आजी-आजोबा किंवा पालक एकत्रितपणे मुलाचे नाव ठरवतात. त्यात धर्म, ज्योतिष आणि चालीरीती देखील महत्त्वाची भूमिका बजावतात. परंतु अमेरिकेतील एका महिलेने याच कामाला उत्पन्नाचं साधन बनवलं आहे. सॅन फ्रान्सिस्कोमध्ये राहणारी टेलर हम्फ्री नावाची महिला मुलांचे नाव सुचवण्यासाठी लाखो रुपये घेते. तिच्या कामाचे वैशिष्ट्य म्हणजे अद्वितीय, विशिष्ट आणि संस्मरणीय नावं सुचवणं. म्हणूनच श्रीमंत कुटुंबातील लोक बाळाला खास नाव देण्यासाठी तिच्याकडे येतात. न्यू यॉर्क पोस्टमधील एका वृत्तानुसार, टेलरने हे काम २०१८ मध्ये सुरू केलं. त्या वेळी ती फक्त १०० डॉलर्स (८,००० रुपये) मध्ये नावं सुचवत असे. त्यानंतर एका पार्टीतील उद्योजकांसोबत तिचं बोलणं झाल आणि त्या उद्योजकांनी महिलेला कामाचा दर वाढवण्यास सांगितले. पुढील काळात सुप्रसिद्ध 'न्यूयॉर्कर' मासिकात टेलरची कथा




प्रकाशित झाल्यानंतर तर कामाचा प्रचंड ओघ सुरू झाला. बघता बघता तिचा हा छोटासा उपक्रम एका मोठ्या व्यवसायात रूपांतरित झाला.

आता नवजात बालकांना खास नाव सुचवण्यासाठी टेलर प्रचंड मानधन घेते. भारतीय चलनात मोजायचे तर ही किंमत१७ हजार रुपयांपासून २७ लाख रुपयांपर्यंत असू शकते. कोणी लहान पॅकेज घेत असेल तर टेलर ईमेलद्वारे काही नावे सुचवते; पण मोठे पॅकेज घेणाऱ्यांसाठी ती बरीच माहिती गोळा करते. ती कुटुंबाच्या मूळ देशाबद्दल, त्यांच्या परंपरांबद्दल, इच्छांबद्दल विचारून बाळाचं नाव ठरवते. आई-वडिलांमध्ये नावावरून मतभेद असल्यास टेलर एक नाव निश्चित करण्यासाठी देखील मदत करते.

# असाही योगायोग...

भारतात येणारे राजकीय नेते ताज महालला भेट देतात. ताज महाल हे प्रेमाचं प्रतीक. सौंदर्याची खाण. म्हणूनच हा संगमरवरी ताज महाल अनेकांना भुरळ घालतो. ताज महाल प्रेमाचं प्रतीक असलं तरी या ऐतिहासिक ठिकाणाला भेट देणाऱ्या राजकीय नेत्यांचं तसंच काही प्रसिद्ध व्यक्तींचं लग्न मोडल्याच्या घटना घडल्या आहेत! अर्थात हा एक योगायोग म्हणता येईल. २००० मध्ये रशियाचे राष्ट्रपती व्लादिमिर पुतीन आपल्या पत्नीसोबत ताज महाल पहायला गेले. मात्र तीन वर्षांनंतर त्यांचा घटस्फोट झाला. १९९२ मध्ये प्रिन्सेस डायना यांनी ताज महालला भेट दिली. त्यावेळी प्रिन्स चार्ल्स त्यांच्यासोबत नव्हते. प्रिन्स चार्ल्सच्या अनुपस्थितीबाबत त्यांना काही प्रश्नही विचारण्यात आले. मात्र यानंतर दहा महिन्यांनी डायना आणि प्रिन्स चार्ल्स यांचा घटस्फोट झाला. हॉलिवूड अभिनेता टॉम क्रूज २०११ मध्ये भारतात आला होता. टॉम क्रूज अनिल कपूरसोबत ताज महाल बघायला गेला होता. मात्र २०१२ मध्ये त्याने तिसरी पत्नी कॅटी होम्सशी घटस्फोट घेतला. २००९ मध्ये हॉलिवूड स्टार रसेल ब्रांड ताज महाल बघायला आला होता. त्याच्यासोबत प्रेयसी कॅटी पेरीसुद्धा होती. नंतर या दोघांनी लग्न केलं. पण १४ महिन्यांनी त्यांचा घटस्फोट झाला. २०१२ मध्ये प्रसिद्ध टेनिसपटू बोरिस बेकर पत्नी लीलीसह ताज महाल बघायला आला होता. मात्र नंतर त्यांचा घटस्फोट झाला. १९६२ मध्ये अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रपती जॉन एफ. केनेडी यांच्या पत्नी जॅकलीन केनेडी भारत दौऱ्यावर आल्या होत्या. या दौऱ्यात त्यांनी ताज महाल बघितला. मात्र यानंतर १९६३ मध्ये केनेडी यांची हत्या झाली आणि जॅकलीन एकट्या पडल्या.



# श्रीमंतानी टाकलेल्या वस्तू विकून ती झाली श्रीमंत!

नकोशा असल्याने टाकलेल्या वस्तूंचे भंगार उचलून कोणी श्रीमंत बनू शकतो का ? ही गोष्ट आश्चर्यकारक असली तरी खरी आहे. एका महिलेने टाकाऊतून टिकावू वस्तू तयार करत श्रीमंती गाठली आहे. या महिलेने लोकांनी टाकून दिलेले जुने सामान रिपेअर करून



महागड्या किंमतीत विकण्यास सुरुवात केली.

या अमेरिकन महिलेने अलिकडेच त्यांची कहाणी जगाला सांगितली. टेक्सासमध्ये राहणाऱ्या ३० वर्षीय मॅगी मॅकगॉ यांनी कधी विचार केला नसेल, की दुसऱ्याने टाकलेल्या वस्तूंमुळे त्यांचे भविष्य बदलेल. आज मॅगी टिकटॉक स्टार आहेत. टिकटॉकवर त्यांचे १९ लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. त्यांना ४.५ कोटीहून अधिक लाईक्स मिळाले आहेत. मॅगी जुने फर्निचर तसेच रस्त्याच्या कडेला पडलेल्या वस्तू उचलून घरी आणतात आणि त्याला नवे रुप देतात. या वस्तू विकून त्या बक्कळ पैसे कमावत आहेत.

मॅगी यांना २०२० मध्ये आर्थिक तंगीचा सामना करावा लागला. त्या वेळी त्यांनी रस्त्याच्या कडेला टाकलेले जुने टेबल उचलून घरी आणले आणि आवश्यक ती दुरुस्ती, डागडुजी करुन आकर्षक कलर लावला. त्या म्हणतात की, त्याआधी हातात कधी पेंट ब्रशदेखील घेतला नव्हता न कोणते पॉवर टूल वापरले होते. त्या स्वत:ला कधीच क्रिएटीव्ह वगैरे मानत नव्हत्या. परंतु यानंतर त्यांचे आयुष्य बदलले. काही वेळा त्या दोन तासात श्रीमंत परिसरातून ६०० डॉलर (सुमारे ५०,००० रुपये) पर्यंतचे सामान एकत्र करतात.

# तो सहज पचवतो जंक फूड

फ्रेंच फ्राईज, हॉट डॉग, बर्गर, पिझ्झा हे पदार्थ आरोग्यासाठी हानिकारक मानले जातात. यांची गणना जंक फूडमध्ये केली जाते. हे जंक फूड कधी तरी खाणं ठिक आहे. पण आपण दररोज हे पदार्थ खायला सुरूवात केली तर... या पदार्थांचे दुष्परिणाम शरीरावर दिसून येतील. कोलेस्टरॉल, हृदयविकार, उच्च रक्तदाब, स्थूलपणा, मधूमेह अशा असंख्य विकारांना हे जंक फूड कारणीभूत ठरतं. पण बेल्जियमच्या फ्लेमिश ब्रेबेंट प्रांतातल्या स्केफेनमध्ये राहणारा रूडी गिबेल्स ३२ वर्षांपासून दररोज रात्री जेवणात फक्त फ्राईज आणि बर्गर खातो. रूडी ४५ वर्षांचा आहे. विशेष म्हणजे तो निरोगी आहे. त्याला जीवनशैलीशी संबंधित कोणताही आजार नाही. रूडी बेल्जियममध्ये खूप लोकप्रिय आहे. अनेक वृत्तपत्रांनी त्याला 'द अल्टीमेट बेल्जियन'चा किताबही दिला आहे. रूडीला फास्ट फूडचं व्यसन जडलं आहे. फास्ट फूडशिवाय आपल्याला दुसरं कोणतंही व्यसन नसल्याचं रूडी सांगतो. दोन वर्षांपूर्वी रूडी फ्लूने आजारी होता. त्या काळात बाजारातून फ्राईज आणि हॉट डॉग आणणं त्याला जमलं नाही. फक्त एवढाच काळ त्याने दुसरं अन्न खाल्लं. लहानपणी रूडीची आई त्याला आरोग्यदायी फळं आणि भाज्या खायला द्यायची. मग रात्री त्याला आवडीचे पदार्थ मिळायचे. रूडीला फ्राईज आणि हॉट डॉग आवडू लागले. मग त्याला या पदार्थांची सवय लागली. रूडीला जंक फूडचा त्रास झाला नसला तरी हा फक्त अपवाद असल्याचं डॉक्टरांचं म्हणणं आहे. प्रत्येकाच्या बाबतीत असं घडू शकत नाही. त्यामुळे कोणीही असला प्रयोग करून बघू नये, असं डॉक्टरांचं म्हणणं आहे.



# लक्झम्बर्गला या. बिनधास्त फिरा

राजधानी दिल्लीत महिलांना बसमधून मोफत प्रवास करता येतो. यासोबतच काही राज्यांमध्ये महिलांना सवलतीत तिकिट दिलं जातं. महिलावर्गाला खूश करण्यासाठी राजकारणी अशा विविध सवलती आणि योजनांची घोषणा करतात. मात्र लक्झम्बर्ग या देशातली सार्वजनिक वाहतूक सर्वांसाठी मोफत करण्यात आली आहे. तुम्ही महिला असा वा पुरुष, सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर करण्यासाठी तुम्हाला एकही पैसा खर्च करावा लागणार नाही.

ट्रेन, ट्राम तसंच बसमधून प्रवाशांना मोफत फिरता येईल. लक्झम्बर्गचे नागरिकच नाहीत तर इथे येणाऱ्या पर्यटकांनाही या सुविधेचा लाभ घेता येणार आहे. म्हणजेच लक्झम्बर्गमध्ये येणारे पर्यटक सगळीकडे मोफत फिरू शकतील. लक्झम्बर्ग हा युरोप खंडातला सातव्या क्रमांकाचा सर्वात लहान पण श्रीमंत देश आहे. हा देश खूप सुंदर आहे. इथे पर्यटकांचा राबता असतो. एक मार्च २०२० पासून इथे प्रवाशांना मोफत फिरता येणार आहे. २०१८ च्या अखेरीस झेवियर बेटल यांनी लक्झम्बर्गच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली. निवडणूक प्रचारादरम्यान त्यांच्या पक्षाने मोफत वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्याचं आश्वासन दिलं होतं. या आश्वासनानुसार सरकार मोफत प्रवास योजना लागू करणार आहे. सरकारच्या




या निर्णयाचा लाभ लक्झम्बर्गचे सहा लाख नागरिक, एक लाख ७५ हजार मजूर आणि वर्षभरात लक्झम्बर्गला येणाऱ्या १२ लाख प्रवाशांना होणार आहे. सार्वजनिक वाहतूक सेवा मोफत उपलब्ध करून दिल्यामुळे गाड्यांची गर्दी कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. अधिकाधिक नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा लाभ घ्यावा, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिक वापर केल्यास प्रदूषणाचं प्रमाणही कमी होईल. लक्झम्बर्गमध्ये गाड्यांची संख्या प्रचंड आहे. इथली जवळपास ६० टक्के जनता प्रवासासाठी वैयक्तिक गाड्यांचा वापर करते. मात्र ताज्या निर्णयामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या वापराला प्रोत्साहन मिळणार आहे.

